# NUTA BULLETIN

OFFICIAL JOURNAL OF NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION

Regd. No. MAHBIL/2001/4448 : Postal Registration No. ATI/RNP/078/2018-2020

**YEAR : 43)** **15th September 2018 ( No. of Pages 12 )** **( No : 08**


## *दिनांक २५ सप्टेंबर २०१८ पासून बेमुदत काम बंद आंदोलनामुळे होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या नुकसानाची संपूर्ण जबाबदारी ही राज्यशासनाच्या उच्च शिक्षण विभागाच्या उदासिनतेच्या धोरणांवर राहील ही बाब स्पष्ट करण्यात येत आहे.*

### महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाच्या बुधवार, दिनांक ५ सप्टेंबर २०१८ रोजीच्या मुंबई येथील बैठकीत संमत करण्यात झालेला ठराव

**१.** महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या आमसभेने मुंबई येथे दिनांक १७ जून २०१८ रोजी आंदोलनाबाबतचा जो मूळ ठराव मंजूर केलेला होता त्यामध्ये कोणकोणत्या विषयावर शासनाकडून निर्णय होणे अपेक्षित आहे याची यादी दिलेली होती व त्याचबरोबर आंदोलनाचा कार्यक्रम दिलेला होता. महासंघाच्या कार्यकारी मंडळाने नागपूर येथे दिनांक २९ जुलै २०१८ रोजी झालेल्या बैठकीत ज्या मुद्यांबाबत शासनाशी चर्चा करावयाची त्या प्रत्येक मुद्यांबाबतची तपशीलवार माहिती नमूद करणारा ठराव मंजूर केला होता. हे दोनही ठराव त्या त्या वेळी लगोलगच शासनाला सादर करण्यात आले होते. आज दिनांक ५ सप्टेंबर २०१८ रोजी झालेल्या कार्यकारी मंडळाच्या बैठकीमध्ये आंदोलनाच्या सद्यःस्थितीचा आढावा घेण्यात आला. **राज्यशासनाकडून याबाबतीत संपूर्णपणे उदासिनतेचे धोरण स्वीकारण्यात आल्याचे दिसून येत असून या प्रत्येक मुद्यांबाबतचे तपशील लोकांसमोर मुख्यत्वे विद्यार्थ्यांसमोर प्रखरपणे मांडण्याची आवश्यकता आहे असे या कार्यकारी मंडळाला वाटते.**

**२.१** राज्यात वेतन आयोगाच्या वेतनश्रेण्या अंमलात येण्यापूर्वी विद्यापीठ अनुदान आयोगाने उच्च शिक्षणाचा दर्जा टिकवून ठेवण्याच्या प्रयोजनार्थ रेग्युलेशन्स निर्गमित केले, ही गोष्ट भारतीय संविधान अस्तित्वात आल्यापासून पहिल्यांदाच घडलेली आहे. राष्ट्रीय स्तरावरील ही एक मोठी घटनात्मक घडामोड असून राज्यस्तरावरील व्यवस्था या घटनात्मक घडामोडीपासून अप्रभावित राहू शकत नाहीत. केंद्रशासनाच्या संमतीने विद्यापीठ अनुदान आयोगाने दिनांक १८ जुलै २०१८ रोजी निर्गमित केलेले "UGC Regulations on minimum qualifications for appointment of teachers and other academic staff in Universities and Colleges and other measures for the maintenance of standards in Higher Education, 2018" हे त्याच दिवशीच्या म्हणजे १८ जुलै २०१८ च्या भारत शासन (असाधारण) राजपत्रामध्ये प्रकाशित करण्यात आलेले आहे. भारतीय घटनेच्या सातव्या परिशिष्टातील पहिल्या सूचीमध्ये म्हणजे केंद्रसूचीमध्ये ६६ व्या क्रमांकावर "Co-ordination and determination of standards in institutions for higher education or research and scientific and technical institutions." हा विषय नमूद करण्यात आलेला आहे. केंद्र सूचित असलेल्या विषयाबाबत विधिविधानाचे व प्रशासनाचे अधिकार हे केंद्र शासनाला व संसदेलाच असतील अशी घटनेच्या कलम २४६ मध्ये तरतूद आहे. ती पुढीलप्रमाणे :- "..... Parliament has exclusive power to make laws with respect to any of the matters enumerated in List I in the Seventh Schedule (in this Constitution referred to as the "Union List")" **घटनेने दिलेल्या या अधिकाराचा वापर करून केंद्राने "विद्यापीठ अनुदान आयोग अधिनियम १९५६" हा कायदा पारित केला. या कायद्याच्या २६ व्या कलमान्वये रेग्युलेशन करण्याचे अधिकार विद्यापीठ अनुदान आयोगाला प्रदान करण्यात आलेले आहेत.**

**२.२** आता विद्यापीठ अनुदान आयोगाने दिनांक १८ जुलै २०१८ रोजी निर्गमित केलेले हे रेग्युलेशन्स "Measures for the maintenance of standards in Higher Education" यासाठी निर्गमित करण्यात आले असून त्याचा तसा उल्लेख या रेग्युलेशन्समध्ये अनेक ठिकाणी आहे. **हा विषय पूर्णपणे केंद्र सूचीत असल्यामुळे त्या विषयावर कायदे करण्याचा अधिकार फक्त संसदेला असून त्याच्या प्रशासनाचे अधिकार केंद्र शासनालाच आहेत.**

**२.३** भारताच्या घटनेतील तरतुदीप्रमाणे हे रेग्युलेशन्स बंधनकारक असून या रेग्युलेशन्सच्या परिच्छेद १२ मध्ये विद्यापीठातून व महाविद्यालयातून रिक्त असलेल्या सर्व जागा या ताबडतोब भरण्यात याव्यात असे बंधन घालण्यात आलेले आहे. मेडिकल कौन्सिल ऑफ इंडिया, सेंट्रल कौन्सिल ऑफ इंडियन मेडिसीन, बार कौन्सिल ऑफ इंडिया इत्यादी शीर्षस्थ संस्थांची निर्मिती ही

## Nagpur University Teachers' Association

### MEETING NOTICE : 1

**DATED : 15.09.2018**

**From :**
**Dr. Vilas Dhone**
Secretary, NUTA
14, Samruddhi Nagar,
Sewagram Road, Wardha-442 001

**To,**

All the members
of the Nagpur University Teachers' Association

Dear members,

I have the honour to inform you that the General Body meeting of the Nagpur University Teachers' Association will be held at 12.00 noon, on the Day and the Date mentioned below.

2. If you propose to move any resolution for the consideration of the General Body, you are requested to send such resolution to me, with a copy to Prof. P.B. Raghuwanshi, President NUTA, Buty Plot, Near Mahajan wadi, Rajapeth, Amravati 444 601 within a period of 10 days from the date of the posting of this Bulletin.

3. It will not be possible to include in the agenda, resolutions received after the due date. So please make it convenient to send such resolutions, if any, within the stipulated time. The place of the meeting will be intimated to you alongwith the agenda.

Thanking you.

Yours faithfully
**Sd/- Dr. Vilas Dhone,**
Secretary, NUTA.

***Time, Day and Date of the Meeting***
***12.00 Noon on Sunday, the***
***9th December, 2018***

केंद्राच्या कायद्याने करण्यात आलेली असून त्या संस्थांना सुद्धा त्या त्या कायद्याने रेग्युलेशन्स करण्याचे अधिकार दिलेले आहेत आणि हा विषय पूर्णपणे केंद्रशासनाच्या अख्यत्यारित असल्यामुळे त्याबाबतीत करण्यात आलेले रेग्युलेशन्स हे देशभर सर्वत्र समरितीने बंधनकारकपणे लागू होतात. वेतनश्रेण्यांची अंमलबजावणी करण्याच्या पूर्वी विद्यापीठ अनुदान आयोगाने रेग्युलेशन्स निर्गमित करण्याचा अधिकार वापरला ही गोष्ट भारतात सर्वप्रथम घडलेली असून त्या रेग्युलेशन्सची बंधनकारकता लक्षात घेता शासनाने रिक्त पदे भरण्याबाबत ताबडतोब आदेश निर्गमित करावे अशी विनंती या महासंघाने वारंवार शासनाकडे केलेली आहे. **एवढी मोठी घटनात्मक बंधनकारक तरतूद अंमलात आणण्याच्या प्रयोजनार्थ चर्चा करण्यासाठीसुद्धा शासनात कोणालाही वेळ मिळू नये ही गोष्ट शिक्षणाविषयीच्या राज्यशासनाच्या उदासिनतेच्या धोरणाचे प्रतिनिधीत्व करणारी आहे असे कार्यकारी मंडळाला वाटते.**

**३.** विनाअनुदानित अभियांत्रिकी महाविद्यालयातून अस्तित्वात नसलेल्या वेतन वितरण व्यवस्थेकडे सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर तरी शासनाने लक्ष द्यावे व त्या निर्णयाचे पालन करण्याच्या प्रयोजनार्थ वेतन वितरण व्यवस्था यथोचितरित्या स्थापन करण्यात यावी अशी विनंती या महासंघाने राज्यशासनाला केलेली होती. पण त्याबाबतीत साधी चर्चा करण्यासाठी सुद्धा शासनात कुणालाही वेळ नाही. मग निर्णय होणे तर दूरच राहिले. या शिक्षकांना लागू असलेल्या वेतनश्रेण्या हिशेबात धरून शिक्षण शुल्क ठरवून देण्याचे काम मा.उच्च न्यायालयाच्या सेवानिवृत्त न्यायमूर्तींच्या अध्यक्षतेखालील प्राधिकरणाकडे सोपविण्यात आलेले आहे. असे असतांना विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या स्कॉलरशिपची रक्कम विद्यार्थ्यांच्या खात्यामध्ये जमा होईल अशा प्रकारची अत्यंत न्यायोचित व्यवस्था स्थापित करण्यात आली ही अत्यंत समाधानाची बाब असली तरी **शिक्षण शुल्कापोटी गोळा करण्यात आलेल्या रक्कमेतील वेतनाचा भाग शिक्षकांच्या खात्यावर जमा केला जाईल अशी व्यवस्था अस्तित्वात आणणे सहज शक्य असतांना मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतरसुद्धा त्याबाबतीत कोणतीही कारवाई न केल्यामुळे अनेक महिने वेतनाशिवाय काम करण्याच्या स्थितीला या महाविद्यालयातील शिक्षकांना तोंड द्यावे लागत आहे.** वारंवार महासंघाने ही बाब शासनाच्या लक्षात आणून दिलेली आहे पण याबाबत कोणतीही कारवाई केली गेली नाही, जात नाही हे अत्यंत खेदजनक होय.

**४.** व्यथा निवारक यंत्रणेची स्थापना करण्याबाबत सुद्धा शासन सातत्याने दुर्लक्ष करीत आहे असे स्पष्टपणे दिसून येते. शासनाने घेतलेल्या निर्णयातून उद्‌भवलेल्या व्यथा निवारणार्थ व्यथा निवारक यंत्रणा स्थापित करावी असे आदेश मा.मुंबई उच्च न्यायालयाने आपल्या दिनांक १० मे २०१३ रोजीच्या आदेशात दिलेले होते. या व्यथांचे उगमस्थान मंत्रिमंडळाने घेतलेल्या किंवा मंत्रिमंडळाकडून करवून घेतलेल्या निर्णयामध्येच असते. विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षणाच्या बाबतीत **मंत्रिमंडळाच्या निर्णयातून काही व्यथा उद्‌भवलेल्या असतील तर त्याबाबतीत शिक्षकांचे म्हणणे ऐकून घेण्यासाठी सचिवांच्या समितीची स्थापना करून राज्यशासनाने मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्णयाची घोर अवहेलना केलेली आहे.** ही बाब वारंवार लक्षात आणून दिलेली असतांना शासन त्यामध्ये दुरुस्ती करायला तयार नाही हे अत्यंत निंदास्पद होय.

**५.** जुन्या व नवीन पेन्शन योजनेबाबतचा घोळ अजूनही संपुष्टात येत नाही ही अत्यंत दुर्दैवाची गोष्ट आहे. नवीन पेन्शन योजना ही अत्यंत घातक असून शेअर बाजाराच्या भरवशावर आणि विमा कंपन्यांच्या कर्तेपणावर या योजनेचे भवितव्य अवलंबून असल्यामुळे सर्व शिक्षक व कर्मचाऱ्यांचा नवीन पेन्शन योजनेला तीव्र विरोध आहे. मुळातच काही वर्गांना ही नवीन पेन्शन योजना लागू करण्यात आलेली नव्हती व त्यानंतरच्या कालखंडामध्ये काही वर्ग या नवीन पेन्शन योजनेच्या जोखडातून बाहेर पडलेले आहेत. अगदीच उदाहरणासह बोलावयाचे झाल्यास असे सांगता येईल की, घटनात्मक पद धारक असलेल्या राज्यकर्त्या श्रेष्ठजनांना नवीन पेन्शन योजना कधीच लागू करण्यात आलेली नव्हती. घटनेतील तरतुदींप्रमाणे संसद किंवा राज्यविधानमंडळाने केलेल्या कायद्याने याबाबतच्या पेन्शन योजना अस्तित्वात आलेल्या आहेत. यातील काही पेन्शन योजना ह्या जुन्या पेन्शन योजनेसारख्याच असून काही योजना ह्या जुन्या पेन्शन योजनेपेक्षा सरस आहेत. २००४ पूर्वी झालेल्या कायद्यांनी त्या पेन्शन योजना अस्तित्वात आलेल्या आहेत. त्या कायद्यांमध्ये बदल झालेले नसल्यामुळे आजही जुन्या पेन्शन योजना तेथे चालू आहेत. केंद्रशासनाने मुळात नवीन पेन्शन योजना लागू केली त्यावेळेला संरक्षण दलातील अधिकारी व सैनिक यांना ती योजना लागू राहणार नाही व तेथे जुनीच पेन्शन योजना लागू राहील असा न्यायोचित निर्णय घेतलेला होता.

सारांश काय तर उपरोक्त दोनही वर्गांना नवीन पेन्शन योजना लागू करण्यात आलेली नसून ते जुन्याच पेन्शन योजनेमध्ये समाविष्ट आहेत. आता गेल्या वर्ष दिड वर्षातील न्यायालयीन घडामोडीमध्ये तिसरा वर्ग नवीन पेन्शन योजनेच्या कचाट्यातून मुक्त झालेला आहे ही अतिशय समाधानाची बाब म्हटली पाहिजे. महाराष्ट्रामध्ये न्यायिक सेवेमध्ये कार्यरत असलेल्या न्यायिक अधिकाऱ्यांना ३१ ऑक्टोबर २००५ च्या शासननिर्णयान्वये नवीन पेन्शन योजना लागू करण्यात आलेली होती पण मा.मुंबई उच्च न्यायालयाने दिनांक ११ ऑगस्ट २०१७ रोजी दिलेल्या एका निर्णयामुळे नवीन पेन्शन योजनेच्या जोखडातून या वर्गाची आता सुटका झालेली आहे. राज्यशासकीय कर्मचारी व सर्व स्तरावरील शिक्षक हे मात्र अजूनही नवीन पेन्शन योजनेच्या कचाट्यातून मुक्त झालेले नाहीत. वस्तुतः विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांच्या बाबतीत विद्यापीठ अनुदान आयोगाच्या सहाव्या वेतन पुनर्विलोकन समितीने (6th PRC) **याबाबतीत केलेल्या शिफारशी या महासंघाने राज्यशासनाच्या लक्षात आणून दिल्या आहेत. पण त्याबाबतीत राज्यशासनाने कोणताही निर्णय घेतलेला नाही ही दुर्दैवाची गोष्ट होय.**

**६.** नवीन विद्यापीठ कायद्याने नामनियुक्त प्रतिनिधींची संख्या विविध प्राधिकरणावर फार मोठ्या प्रमाणात वाढविण्यात आलेली आहे. त्याचे दुष्परिणाम विद्यापीठाच्या प्रशासनावर व संचालनावर मोठ्या प्रमाणात दिसून येत आहेत. **याबाबतची चर्चा करायला सुद्धा उच्च शिक्षण मंत्री तयार नाहीत याबद्दल महाराष्ट्रभर आश्चर्य व्यक्त केले जात आहे.**

**७.१** सातव्या वेतन आयोगाच्या वेतनश्रेण्या लागू करण्याच्या संदर्भात राज्यशासकीय कर्मचाऱ्यांच्या बाबतीत राज्यशासनाने निर्णय घेतला असून तो निर्णय जाहीर करण्यात आलेला आहे. बक्षी समितीचा अहवाल मागे पुढे आला तरी जानेवारी २०१९ पासून २.५७ या गुणकाच्या आधारे नवीन वेतनश्रेण्यांची अंमलबजावणी केली जाईल असा शासननिर्णय दिनांक ६ ऑगस्ट २०१८ रोजी निर्गमित करण्यात आला आहे. विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांच्या बाबतीत विद्यापीठ अनुदान आयोगाच्या सातव्या वेतन पुनर्विलोकन समितीचा (7th PRC) अहवाल सादर झाला, त्यावर विद्यापीठ अनुदान आयोगाचा निर्णय झाला व केंद्रशासनाने सुद्धा त्याबाबतीत निर्णय घेतला व राज्यशासनांकडे पाठविला. अनेक राज्यांनी याबाबतीत निर्णय सुद्धा घेतलेले आहेत. पण महाराष्ट्रात मात्र याबाबतीत कोणताही निर्णय अजून घेण्यात आलेला नाही. सातवा वेतन आयोग विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांना लागू केल्यामुळे येणाऱ्या अतिरिक्त खर्चाचा ५० टक्के भार उचलण्याचे केंद्रशासनाने मान्य केले असून तसे राज्यशासनाला लेखी कळविले आहे. **इतर कोणत्याही वर्गासाठी वेतन पूनर्रचनेच्या बाबतीत असे अर्थसहाय्य**

***भारताच्या घटनेतील तरतुदीप्रमाणे हे रेग्युलेशन्स बंधनकारक असून या रेग्युलेशन्सच्या परिच्छेद १२ मध्ये विद्यापीठातून व महाविद्यालयातून रिक्त असलेल्या सर्व जागा या ताबडतोब भरण्यात याव्यात असे बंधन घालण्यात आलेले आहे.***

( महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाच्या ५ सप्टेंबर २०१८ ठरावाचा परिच्छेद २.३ पहा. )

**केंद्रशासनाकडून दिले जात नाही ते फक्त विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांच्या बाबतीतच दिले जाते. असे असतांना याबाबतीत राज्यशासनाने कोणताही निर्णय घेऊ नये हे अत्यंत खेदजनक होय.**

**७.२** केंद्रशासनाने मान्य केलेल्या विद्यापीठ अनुदान आयोगाच्या वेतनश्रेण्या विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांना मिळू नये यासाठी निरनिराळ्या राज्यांमध्ये सनदी अधिकारी सतत प्रयत्नशील असतात ही गोष्ट लपून राहिलेली नसून आता अधिकृत कागदपत्रातून ती स्पष्ट झालेली आहे. सहाव्या वेतन आयोगाच्या अशा वेतनश्रेण्या लागू करतांना "केंद्रशासनाकडून सर्व राज्यांसाठी ७७०० कोटीहून जास्त रुपयांचा निधी केंद्रशासनाने उपलब्ध करून दिला होता. पण **केंद्रशासनाकडून ही मदत पूर्णपणे मिळविणाऱ्या राज्यांची संख्या केवळ १४ आहे**" ही गोष्ट दिनांक ९ ऑगस्ट २०१८ रोजी राज्यसभेत तारांकित प्रश्न क्रमांक २४१ ला उत्तर देतांना केंद्रशासनाने नमूद केलेली आहे. इतर राज्यांनी मंत्रिमंडळात योग्य निर्णय घेतले नाही. योग्य शासननिर्णय निर्गमित केले नाहीत. अटींची पूर्तता केली नाही असे यातून स्पष्ट होते. याच उत्तरामध्ये केंद्रशासनाने असेही नमूद केले आहे की, "सहाव्या वेतन आयोगाची अंमलबजावणी करण्यासाठी जो अर्थभार केंद्रशासनाने सहन करण्याची योजना आखलेली होती ती १ जुलै २०१८ पासून बंद करण्याचे केंद्रशासनाने ठरविले आहे." याच उत्तरामध्ये पुढे असेही नमूद करण्यात आले आहे की, "सातव्या वेतन आयोगाशी समकक्ष वेतनश्रेण्या विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांना लागू करण्याची विद्यापीठ अनुदान आयोगाची योजना केंद्रशासनाने मान्य केली असून **केंद्रशासन त्यापोटी सहन करणार असलेला अर्थभार मदत रुपाने मिळविण्यासाठी राज्यांनी आपले प्रस्ताव ताबडतोब सादर करावे असेही राज्यांना कळविण्यात आलेले आहे.**"

**७.३** या ठिकाणी एका दुर्दैवी घटनाक्रमाचा उल्लेख मा. मुख्यमंत्री व उच्च शिक्षण मंत्र्यांच्या लक्षात आणून देणे या महासंघाला आवश्यक वाटते. ती दुर्घटना अशी की, केंद्राचे अर्थसहाय्य राज्याला नाही मिळाले तरी चालेल पण विद्यापीठ अनुदान आयोगाच्या वेतनश्रेण्या महाराष्ट्रातील विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांना लागू करावयाच्या नाहीत असा निर्धार त्यावेळेला उच्च शिक्षण सचिवांनी केला होता व तसा प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर ठेवून दिनांक २३ जुलै २००९ रोजीच्या बैठकीत संमत करून घेतला होता. दुसऱ्याच दिवशी दिनांक २४ जुलै २००९ रोजी एक पत्र लिहून या महासंघाला "राज्यशासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे सहावा वेतन आयोग लागू करण्याचा निर्णय मंत्रिमंडळाने घेतलेला आहे" असे लेखी कळविले होते. त्यावर महाराष्ट्रातील उच्च शिक्षण क्षेत्रामध्ये तीव्र प्रतिक्रिया उमटली होती. या सर्व बाबतीत तत्कालीन मुख्यमंत्र्यांच्या जेव्हा ही गोष्ट त्याच्या दुष्परिणामासह या महासंघाने लक्षात आणून दिली त्यावेळेला पुढच्याच आठवड्यात दिनांक ३० जुलै २००९ रोजी झालेल्या बैठकीमध्ये तत्कालीन मुख्यमंत्री मा.श्री.अशोकराव चव्हाण यांनी विद्यापीठ अनुदान आयोगाच्या वेतनश्रेण्या लागू करण्याचा निर्णय मंत्रिमंडळामध्ये करवून घेतला व तसे दिनांक ३१ जुलै २००९ रोजी लेखी पत्रान्वये या महासंघाला कळविण्यात आले. मंत्रिमंडळाने त्यावेळी पुनर्निर्णय केला नसता तर या कामी केंद्रीय अर्थसहाय्य मिळविलेल्या राज्यांची संख्या १४ ऐवजी १३ राहिली असती.

**७.४** तसेही पाहता विद्यापीठ अनुदान आयोगाने सन २०१८ चे रेग्युलेशन्स केंद्रशासनाच्या पूर्वपरवानगीने निर्गमित केलेले असून ते दिनांक १८ जुलै २०१८ च्या भारत शासन राजपत्रामध्ये प्रकाशित करण्यात आलेले आहे त्यातील वेतन व्यवस्थेचा भाग सोडून इतर सर्व बाबी बंधनकारक आहेत. वेतन व्यवस्थेचा निर्णय राज्यशासनाने घ्यावा असे त्या रेग्युलेशन्समध्येच नमूद आहे. तो निर्णय अजूनही राज्यशासनाने न घेतल्यामुळे व या रेग्युलेशन्समधील सर्व बाबी बंधनकारक मात्र फक्त वेतन व्यवस्था अबंधनकारक अशी स्थिती निर्माण झालेली आहे. ती महाराष्ट्रासारख्या प्रागतिक राज्याला भूषणावह नाही. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या केंद्रशासनाने मान्य केलेल्या वेतनश्रेण्या लागू करतांना सनदी अधिकारी निश्चितपणे कपट कारवाया करतील अशा प्रकारच्या बातम्यांनी महाराष्ट्रातील उच्च शिक्षण क्षेत्राला घेरलेले आहे. राज्यशासकीय कर्मचाऱ्यांच्या वेतनश्रेण्यांच्या बाबतीत शासनाने घेतलेला निर्णय आता अधिकृतपणे जाहीर करण्यात आलेला असल्यामुळे विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांना विद्यापीठ अनुदान आयोगाने लागू केलेल्या वेतनश्रेण्यांच्या बाबतीत शासनाने काय निर्णय घेतलेला आहे? हे जाणून घेण्याचा विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांना निश्चितच अधिकार आहे. चर्चेतील युक्तीवादाला तोंड देण्यास असमर्थ असलेल्या त्यावेळच्या उच्च शिक्षण सचिवांनी सहाव्या वेतन आयोगाच्या वेळेला एकतर्फी पत्र पाठविण्याचा जो सपाटा सुरू केला होता त्याचे अत्यंत दुर्दैवी दुष्परिणाम महाराष्ट्राने सहाव्या वेतन आयोगाच्या वेळेला पाहिलेले आहेत. या महासंघाच्या आमसभेने संमत केलेल्या ठरावात "If during the course of agitation negotiated settlement is not reached/arrived at then State-wide Indefinite Cease Work will begin from 25th September 2018." ही बाब स्पष्ट केलेली आहे.

**८.** भारतीय संविधानातील तरतुदीनुसार निघालेल्या बंधनकारक रेग्युलेशन्सची अंमलबजावणी करण्याकडे सातत्याने दुर्लक्ष करण्याची बाब **ही स्पृहणीय नाही.** विनाअनुदानित महाविद्यालयातून वेतन वितरण व्यवस्था स्थापित करण्याबाबत सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाकडे दुर्लक्ष करण्याचा **प्रकार गर्हणीय आहे.** सहाव्या वेतन आयोगाच्या वेळी फक्त १४ राज्यांना केंद्रशासनाचे पूर्ण अर्थसहाय्य मिळू शकले ही वस्तुस्थिती राज्यसभेत स्पष्ट झालेली असतांना त्यावेळी महाराष्ट्रामध्ये या महासंघाने दाखल केलेल्या शपथपत्रानंतर मा. उच्च न्यायालयाने दिनांक १० मे २०१३ रोजी दिलेल्या निर्णयामुळे केंद्रशासनाचे अर्थसहाय्य मिळू शकले. हा ऐतिहासिक घटनाक्रम महाराष्ट्रातील शिक्षक विसरू शकत नाहीत. केंद्रशासनाकडून एक रुपया अर्थसहाय्य मिळाले नाही तरी चालेल पण विद्यापीठ अनुदान आयोगाच्या वेतनश्रेण्या या राज्यातील विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांना मिळू द्यायच्या नाही, या सनदी अधिकाऱ्यांच्या कारस्थानाबाबत आज आता सातव्या वेतन आयोगाच्या वेळीसुद्धा राज्यशासनाची भूमिका स्पष्ट होत नाही. **ही बाब अत्यंत अनुचित होय.** शासनाने काढलेल्या शासननिर्णयाचे पालन करण्याला खुद्द शासनच तयार नाही, अशा विचित्र परिस्थितीला महाराष्ट्रातील उच्च शिक्षण क्षेत्राला तोंड द्यावे लागत आहे. १५ फेब्रुवारी २०११ रोजी उच्च व तंत्र शिक्षण विभागाने काढलेल्या शासननिर्णयामध्ये विद्यापीठ अनुदान आयोगाच्या ३० जून २०१० च्या अधिसूचनेतील परिच्छेद १२ बाबत "या परिच्छेदातील सर्व उपपरिच्छेद म्हणजे १२.० ते १२.२ येथील सर्व बाबी जशाच्या तशा लागू करण्यात येत आहेत." असा शासन निर्णय आहे. मात्र उच्च शिक्षण विभागाच्या निष्क्रियतेमुळे निर्माण झालेली विचित्र स्थिती **ही अवर्णनीय आहे असेच म्हणावे लागेल.** यथोचित व्यथा निवारक यंत्रणेची स्थापना न करून मा. उच्च न्यायालयाच्या निर्णयाची उच्च शिक्षण विभागाने घोर अवहेलना केलेली आहे. आतापर्यंतच्या इतिहासाचे अवलोकन करता असे आढळून येते की, उच्च शिक्षण क्षेत्रामध्ये निर्माण झालेल्या व्यथांचे उगमस्थान राज्य मंत्रिमंडळाने घेतलेल्या किंवा राज्य मंत्रिमंडळाकडून करवून घेतलेल्या निर्णयामध्येच होते व असते. असे असतांना त्या व्यथानिवारणाची यंत्रणा म्हणून सचिवांची समिती नेमणे म्हणजे उच्च न्यायालयाच्या निर्णयातून एखादे दुखणे उद्‌भवले असेल तर त्यावर औषध घेण्यासाठी व्यथित व्यक्तीला जिल्हा सत्र न्यायालयाकडे पाठविण्याचाच हा प्रकार आहे. वारंवार ही बाब लक्षात आणून दिल्यावरसुद्धा उच्च शिक्षण विभागाची निष्क्रियता संपुष्टात येत नाही, **हे निंदास्पद होय.** देशातील सर्व घटनात्मक उच्च पदधारक हे जुन्या पेन्शन योजनेत राहतील, संरक्षण दलातील व्यक्तींना जुनीच पेन्शन योजना लागू राहील, महाराष्ट्रातील दुय्यम न्यायालयातून काम करणाऱ्या न्यायिक अधिकाऱ्यांना जुनीच पेन्शन योजना लागू राहील, ह्या बाबी पूर्णपणे समर्थनीय असल्या तरी फक्त महाराष्ट्रातील सर्व स्तरावरचे शिक्षक व कर्मचारी मात्र महाराष्ट्र शासनाच्या ३१ ऑक्टोबर २००५ च्या शासननिर्णयाने नव्या पेन्शन योजनेत ढकलून दिले आहेत. हे कृत्य कदापिही समर्थनीय असू शकत नाही. पण त्याबाबत चर्चा करण्याचीसुद्धा तयारी दाखविली जावू नये **ही गोष्ट तीव्र निर्भर्त्सनेस पात्र आहे.** हा सारा घटनाक्रम लक्षात घेता दिनांक २५ सप्टेंबर पासून सुरू होणाऱ्या आंदोलनाचा मूळ ठराव ठामपणे राबविण्याचा निर्णय घेण्यात येत आहे. दिनांक २५ सप्टेंबर २०१८ पासून बेमुदत काम बंद आंदोलनामुळे होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या नुकसानीची संपूर्ण जबाबदारी ही राज्यशासनाच्या उच्च शिक्षण विभागाच्या उदासिनतेच्या धोरणांवर राहील ही बाब स्पष्ट करण्यात येत आहे.

**(डॉ. तापती मुखोपाध्याय)** — *अध्यक्ष*

**(डॉ. एस. पी. लवांदे)** — *सचिव*

(MFUCTO)

MAHARASHTRA FEDERATION OF UNIVERSITY & COLLEGE TEACHERS' ORGANISATIONS

## सहाव्या वेतन आयोगाची थकबाकी अदा करणे

आणि

# राज्यसभा तारांकित प्रश्न क्रमांक २४१

**प्रा. बी. टी. देशमुख,**

*महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचे माजी अध्यक्ष*

विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांना सहाव्या वेतन आयोगाशी समकक्ष विद्यापीठ अनुदान आयोगाच्या वेतनश्रेण्या लागू करण्याबाबत केंद्रशासनाकडून निरनिराळ्या राज्यांना दिल्या जाणाऱ्या अर्थसहाय्याची योजना आता केंद्रशासनाने दिनांक १ जुलै २०१८ पासून बंद केलेली असून याबाबतची अधिकृत माहिती राज्यसभेमध्ये दिनांक ९ ऑगस्ट २०१८ रोजी दिलेल्या तारांकित प्रश्न क्रमांक २४१ ला केंद्रीय मानव संसाधन मंत्री मा. श्री. प्रकाश जावडेकर यांनी दिलेल्या उत्तरामध्ये तपशीलवारपणे नमूद केलेली आहे.

२. सहाव्या वेतन आयोगाच्या वेतनश्रेण्या अंमलात आणल्यामुळे विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांना त्या वेतनश्रेण्या लागू करण्यामुळे जो जादा अर्थभार राज्यशासनाला सोसावा लागेल त्यापैकी ८० टक्के रक्कम ही केंद्रशासनातर्फे अनुदान म्हणून दिली जाईल. केंद्रशासनाने ३० जून २०१८ या तारखेपर्यंत निरनिराळ्या राज्यांना या कामासाठी ७७०० कोटी रुपयांपेक्षा जास्त निधी प्रत्यक्ष वितरित केलेला आहे असे मा. मानव संसाधन मंत्र्यांच्या या उत्तरात स्पष्टपणे नमूद आहे. ते पुढील शब्दात :-

"The Central Government had released a total amount of Rs.7713,44,11,310/-(Rupees Seven Thousand Seven Hundred Thirteen CroreForty Four Lakh Eleven Thousand Three Hundred Ten only) as central share to different State Governments under the said Scheme till 30.06.2018."

३. केंद्रशासनाने मान्य केलेल्या विद्यापीठ अनुदान आयोगाच्या सहाव्या वेतन आयोगाशी समकक्ष वेतनश्रेण्यांबाबतची योजना राज्याला सर्व अटींसह जशीच्या तशी मान्य असेल तरच केंद्रशासनातर्फे हे अर्थसहाय्य दिले जाईल अशा स्पष्ट सूचना केंद्राने दिलेल्या होत्या. त्यातील एक महत्त्वपूर्ण अट अशी होती की, सर्व थकबाकी प्रथम राज्यशासनाने या शिक्षकांना अदा करावी व त्यानंतरच मग केंद्रशासनातर्फे अनुदान अदा केले जाईल.

**४. देशातील २९ राज्यांपैकी फक्त १४ राज्यांनीच सर्व अटी शर्तींचे पालन करून त्या योजनेची अंमलबजावणी केली व परिपूर्ण प्रस्ताव सादर करून केंद्राकडून मिळणारे संपूर्ण अनुदान प्राप्त करून घेतले.** इतर १५ राज्यांनी सर्व अटींसह तशी अंमलबजावणी न केल्यामुळे त्यातील काही राज्यांना केंद्राचे परतावा अनुदान अजिबात मिळाले नाही किंवा काहींना ते अंशतः मिळाले. ही बाब मा. मानव संसाधन मंत्र्यांच्या या उत्तरामध्ये पुढील शब्दात नमूद आहे. :-

"Out of 29 States, 14 States have been released **total central share** under the scheme on submission of complete proposals by the State Governments. The remaining 15 States have been released **partial central share or no central share** based on the submission of requisite documents by the respective State Government."

५. वारंवार स्मरणपत्रे देऊनसुद्धा अनेक राज्यांनी याबाबतचे परिपूर्ण प्रस्ताव सादर केले नाही आणि त्यामुळे आता १ जुलै २०१८ पासून ही योजना बंद करण्यात येत आहे असेही केंद्रशासनाच्या या उत्तरामध्ये नमूद आहे. ते पुढील शब्दात :-

"The Scheme makes it obligatory on part of the State Governments to implement the Scheme in totality so as to enable the Central Government to reimburse the central share. The Central Government, from time to time, had asked the State Governments to submit complete proposals for reimbursement of central share. **However, several State Governments have not submitted complete proposals for reimbursement of central share even after a lapse of more than eight years of the scheme, despite several reminders. Therefore, the Central Government has decided to close the scheme for reimbursement of central share for** implementation of revised pay scales (6th CPC) for teachers in State Universities and colleges to State Governments **from 01.07.2018."**

६. आता सातव्या वेतन आयोगाच्या अंमलबजावणीला सुरुवात झालेली असून केंद्राचे अर्थसहाय्य मिळविण्यासाठी राज्यांनी प्रस्ताव सादर करण्याबाबत सांगण्यात आलेले आहे ही बाबसुद्धा मा. मानव संसाधन मंत्र्यांच्या या उत्तरामध्ये पुढील शब्दात नमूद आहे :-

"It is further added that the Central Government has notified scheme of revision of pay (7th CPC) of teachers and equivalent cadres in universities and colleges. **The Central Government has asked the State Governments to consider implementation of revised pay (7th CPC) for teachers of State Universities and colleges and submit proposals for reimbursement of central share** subject to conditions laid down in the scheme."

७. केंद्र शासनाची योजना सर्व अटी शर्तीसह एक **समग्र योजना (Composite Scheme)** म्हणून अमलात आणली तरच केंद्र शासनाचे ८० टक्के अर्थ सहाय्य मिळेल असे केंद्राचे आदेश होते. "समग्र योजना" या शब्दाचे महाराष्ट्राच्या उच्च शिक्षण सचिवांना एवढे वावडे की तो शब्द ते मतैक्य पत्रात घ्यायला तयार नव्हते, संघटनेला पाठविलेल्या २४ जुलै, ३१ जुलै व ४ ऑगस्ट २००९ च्या तीन पत्रात त्यांनी तो शब्द कुठेही येणार नाही याची खबरदारी घेतली होती. शासननिर्णयात तर अशी शब्दरचना नाहीच नाही, याउलट १२ ऑगस्ट २००९ च्या शासन निर्णयात त्यांनी परिच्छेद ९ मध्ये "(ii) ...The 80% of the amount of arrears admissible for the period from 1st day of January 2006 to 31st March 2009 will be paid in cash **on receipt of the grants from Government of India.** The remaining 20% amount will be credited to Provident Fund as per the procedure adopted for the State Government Employees." अशी जोरदार मेख मारून ठेवली होती. राज्याने पूर्ण थकबाकी अदा केल्याशिवाय केंद्रसरकार एक छदाम देणार नाही असा केंद्रशासनाचा शासननिर्णय होता. तर "इकडे केंद्रशासनाकडून जसजशी रक्कम मिळेल तसतशी आम्ही थकबाकी रोख अदा करू" अशी जाणूनबुजून दुष्ट बुद्धीची तरतूद टाकणारा शासननिर्णय उच्च शिक्षण विभागाने काढला होता. **परिणामी ८० टक्के अर्थ सहाय्य मिळणार नाही, अशा स्थितीत तिकडून म्हणजे केंद्र शासनाकडून ते मिळाले नाही तर शिक्षकांना ८० टक्के थकबाकी मिळणार नाही. हे उघड दिसत होते.**

८. तत्कालीन उच्च शिक्षण सचिवांच्या नेतृत्त्वाखालील सनदी अधिकाऱ्यांचा मूळ विद्यापीठ अनुदान आयोगाची केंद्रशासन मान्य वेतन योजना अंमलात आणण्यालाच विरोध होता. केंद्राचे अर्थसहाय्य राज्याला नाही मिळाले तरी चालेल पण विद्यापीठ अनुदान आयोगाच्या वेतनश्रेण्या महाराष्ट्रातील विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांना लागू करावयाच्या नाहीत असा निर्धार त्यावेळेला उच्च शिक्षण सचिवांनी केला होता व तसा प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर ठेवून दिनांक २३ जुलै २००९ रोजीच्या बैठकीत तो संमत करून घेतला होता व दुसऱ्याच दिवशी दिनांक २४ जुलै २००९ रोजी एक पत्र लिहून महाराष्ट्र

प्राध्यापक महासंघाला “राज्यशासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे सहावा वेतन आयोग लागू करण्याचा निर्णय मंत्रिमंडळाने घेतलेला आहे” असे लेखी कळविले होते. त्यावर महाराष्ट्रातील उच्च शिक्षण क्षेत्रामध्ये तीव्र प्रतिक्रिया उमटली होती. या सर्व बाबतीत तत्कालीन मुख्यमंत्र्यांच्या जेव्हा ही गोष्ट त्याच्या दुष्परिणामासह महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाने लक्षात आणून दिली त्यावेळेला पुढच्याच आठवड्यात दिनांक ३० जुलै २००९ रोजी झालेल्या बैठकीमध्ये तत्कालीन मुख्यमंत्री मा.श्री.अशोकराव चव्हाण यांनी विद्यापीठ अनुदान आयोगाच्या वेतनश्रेण्या लागू करण्याचा निर्णय मंत्रिमंडळामध्ये करवून घेतला व तसे दिनांक ३१ जुलै २००९ रोजी लेखी पत्रान्वये महासंघाला कळविण्यात आले. आंदोलनाची शक्ती कमी पडली असती व मंत्रिमंडळाने त्यावेळी पुनर्निर्णय केला नसता तर या कामी केंद्रीय अर्थसहाय्य मिळविलेल्या राज्यांची संख्या १४ ऐवजी १३ राहिली असती.

९. थकबाकीबाबतचा गुंता सुटलेला नव्हता. महाराष्ट्रभर सुरू झालेले कामबंद आंदोलन सुरूच होते. लेखी उभयपक्षी तडजोडीचा मसुदा संमत झाल्यावर २६ ऑगस्ट २००९ रोजी आंदोलन मागे घेण्यात आले. महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचे प्रतिनिधी व मा. मुख्य सचिव, प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण व संचालक, उच्च शिक्षण यांची मा. मंत्री, (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे समवेत दिनांक २६ ऑगस्ट, २००९ रोजी बैठक झाली व या बैठकीत संघटनेने मांडलेल्या सर्व मुद्यांवर सविस्तर चर्चा होऊन झालेल्या निर्णयाचे जे मतैक्यपत्र तयार झाले त्यातील पहिलाच निर्णय पुढीलप्रमाणे होता.:-

“(१) केंद्र शासनाने पाठविलेल्या विद्यापीठीय व महाविद्यालयातील शिक्षकांच्या वेतन सुधारणा विषयीची समग्र योजना राज्य शासनाने विचारात घेऊन **त्याबाबतचा शासननिर्णय दिनांक १२.८.२००९ रोजी निर्गमित केला.** या योजनेची अंमलबजावणी करतांना केंद्र शासनाकडून ८० टक्के अर्थसहाय्य मिळावे असे उद्दीष्ट राहील. हे अर्थसहाय्य केंद्र शासनाकडून **न मिळाल्यास ८० टक्के थकबाकीची रक्कम राज्य शासन, राज्य शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे देईल.**”

## GOVERNMENT OF INDIA
### MINISTRY OF HUMAN RESOURCE DEVELOPMENT
### RAJYA SABHA : QUESTION NO 241 : ANSWERED ON 09.08.2018

# Reimbursement of arrears for revised UGC pay scales

**241 Shri D. Kupendra Reddy :** Will the Minister of HUMAN RESOURCE DEVELOPMENT be pleased to state :-

(a) whether the Central Government has not reimbursed the arrears arising out of the implementation of 2006 revised UGC pay scales for the university and college teachers to various States including Karnataka;

(b) if so, the details thereof;

(c) whether the Central Government has taken any action for expediting the release of the said arrears to the States;

(d) if so, the details thereof and by when these funds would be released; and

(e) if not, the reasons therefor?

**ANSWER**

MINISTER OF HUMAN RESOURCE DEVELOPMENT (SHRI PRAKASH JAVADEKAR) :

**(a) to (e) :** A Statement is laid on the Table of the House.

STATEMENT REFERRED TO IN REPLY TO PARTS (a) TO (e) OF RAJYA SABHA STARRED QUESTION NO. 241 FOR 09.08.2018 ASKED BY SHRI D. KUPENDRA REDDY, HON'BLE MEMBER OF PARLIAMENT, REGARDING REIMBURSEMENT OF ARREARS FOR REVISED UGC PAY SCALES.

**(a) to (e) :** Under the Scheme of Revision of Pay (6th CPC) of Teachers and Equivalent Cadres in Universities and Colleges, the Central Government had committed to reimburse 80% of the total financial burden accruedfor the period from 01.01.2006 to 31.03.2010 due to implementation of revised pay scales to teachers of State Universities and colleges to the State Governmentssubject to the condition that the entire Scheme of revision of pay scales, together with all the conditions to be laid down by the UGC by way of Regulations and other guidelines shall be implemented by State Governments and Universities and Colleges coming under their jurisdiction as a composite scheme, by making necessary amendments in statutes, ordinances, rules, etc. of the State Universities.

**Out of 29 States, 14 States have been released total central share under the scheme on submission of complete proposals by the State Governments. The remaining 15 States have been released partial central share or no central share based on the submission of requisite documents by the respective State Government.The Central Government had released a total amount of Rs.7713,44,11,310/-(Rupees Seven Thousand Seven Hundred Thirteen CroreForty Four Lakh Eleven Thousand Three Hundred Ten only) as central share to different State Governments under the said Scheme till 30.06.2018.**Out of the total central share, the Central Government has already released an amount of Rs.584,98,93,110/- (Rupees Five Hundred Eighty Four CroreNinety Eight Lakh Ninety Three Thousand One Hundred Ten only) as central share to the State Government of Karnataka.However, as the State Government of Karnataka has not submitted copies of amended statutes, ordinances, rules, etc. of State Universities, the balance amount of central share amounting to Rs.209,19,77,586/- (RupeesTwo Hundred Nine Crore Nineteen Lakh Seventy Seven Thousand Five Hundred Eighty Six only) could not be released to the State Government of Karnataka.

The Scheme makesit obligatory on part of the State Governments to implement the Scheme in totality so as to enable the Central Government to reimburse the central share. The Central Government, from time to time, had asked the State Governments to submit complete proposals for reimbursement of central share. However,several State Governments have not submitted complete proposals for reimbursement of central share even after a lapse of more than eight years of the scheme, despite several reminders. Therefore, the Central Government has decided to close the scheme for reimbursement of central share for implementation of revised pay scales (6th CPC) for teachers in State Universities and colleges to State Governments from 01.07.2018.

It is further added that **the Central Government has notified scheme of revision of pay (7th CPC) of teachers and equivalent cadres in universities and colleges. The Central Government has asked the State Governments to consider implementation of revised pay (7th CPC) for teachers of State Universities and colleges and submit proposals for reimbursement of central share subject to conditions laid down in the scheme.**

****

**१०.** गुरूवार, दिनांक १ एप्रिल २०१० रोजी आम्ही विचारलेल्या विधानपरिषद तारांकित प्रश्न क्रमांक २५९८ च्या "महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचे (MFUCTO) प्रतिनिधी व महाराष्ट्र शासनाच्या वतीने उच्च शिक्षण मंत्री व मुख्य सचिव यांच्यात मंत्रालयातील,**मा.मुख्य सचिवांच्या दालनात दिनांक २६ ऑगस्ट, २००९ रोजी झालेल्या चर्चेअंती निरनिराळ्या १० मुद्यांवर मतैक्य झाले व अशा मुद्यांचे इतिवृत्त त्याच दिवशी उभयपक्षी स्वाक्षरीत झाले हे खरे आहे काय,**" या प्रश्न भाग एक ला एका शब्दात "होय" असे उत्तर मा.उच्च शिक्षणमंत्र्यांनी दिले होते. "असल्यास, या १० मुद्यांवर आतापावेतो शासनातर्फे मुद्देनिहाय काय कारवाई करण्यात आलेली आहे," या प्रश्न भाग दोनच्या उत्तरात त्यांनी "(२) दिनांक २६ ऑगस्ट, २००९ च्या इतिवृत्तातील **मुद्यांवर करण्यात आलेल्या कार्यवाहीचा मुद्देनिहाय तपशील पुढीलप्रमाणे आहे :-**" असे उत्तर दिले होते व थकबाकीबाबतच्या पहिल्याच मुद्यावरील कारवाई पुढील शब्दात नमूद केली होती. :-

"**मुद्दा क्र.१ :-** केंद्र शासनाकडून अर्थसहाय्य न मिळाल्यास थकबाकीची रक्कम राज्य शासन, राज्य शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे देणार आहे. परंतु केंद्र शासनाने अद्याप तसा निर्णय घेतला नसल्यामुळे राज्य शासनाकडून सद्यःस्थितीत याबाबत कोणतेही आदेश काढण्याची आवश्यकता नाही." *(महाराष्ट्र विधान परिषद कार्यवाही : अधिकृत प्रतिवेदन : खंड १५५, क्रमांक ११, पृष्ठ ३६)*

**११.** दोन वर्षांचा कालखंड उलटून गेला तरी थकबाकी अदा करण्याचे चिन्ह दिसत नव्हते. सन २०१० नंतर महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाने वारंवार प्रयत्न केले असता केंद्राकडून अर्थसहाय्य न मिळाल्यास राज्यशासन थकबाकी देणार होते पण अजूनही केंद्राने तसा काही निर्णय घेतला नाही त्यामुळे राज्यशासनाने थकबाकी अदा करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही असे उत्तर सतत महासंघाला देण्यात येत होते. २०११ आणि २०१२ या दोनही वर्षांमध्ये याबाबतीत कोणतीही प्रगती झाली नाही. महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाच्या रविवार, दिनांक **१६ सप्टेंबर २०१२** रोजीच्या बैठकीत त्यामुळेच आंदोलनाचा ठराव संमत झाला. त्यानुसार राज्यस्तरीय धरणे आंदोलन बुधवार, **दिनांक १० ऑक्टोबर २०१२** रोजी आझाद मैदान, मुंबई वेळ सकाळी ११ ते २ पार पडले. उच्च शिक्षण संचालक, पुणे यांच्या कार्यालयावर राज्यस्तरीय मोर्चा सोमवार, **दिनांक ५ नोव्हेंबर २०१२** दुपारी १२ वाजता आयोजित केला गेला. विधानमंडळ अधिवेशनाच्या वेळी नागपूर येथे राज्यस्तरीय मोर्चा सोमवार, **दिनांक १० डिसेंबर २०१२** रोजी नुटा ऑफिस, डी. लक्ष्मीनारायण बंगला, अमरावती रोड, नागपूर येथून दुपारी १२ वाजता निघाला व शासनाला निवेदन सादर करण्यात आले. राज्याचे मा. मुख्यमंत्री, मा. उच्च शिक्षणमंत्री यांनी दिलेल्या थकबाकी अदा करण्याच्या मुदतबंद लेखी आश्वासनांची पूर्तता होत नाही अशी तक्रार निवेदनात करण्यात आली होती.

**१२.** महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाच्या रविवार, **दिनांक १३ जानेवारी २०१३** रोजी मुंबई येथील बैठकीत आंदोलन तीव्र करण्याबाबतचा ठराव संमत करण्यात आला. या ठरावाच्या परिच्छेद ७ मध्ये असे नमूद करण्यात आले होते की :-

"मा. मुख्यमंत्र्यांनी दिलेल्या अभिवचनाचा आदर करुन या महासंघाने दिनांक १८ मे, २०१२ रोजीच्या ठरावान्वये गेल्यावेळी आंदोलन एकतर्फी मागे घेतले होते, त्याबद्दल शिक्षकांवर सूड उगविण्याचा उच्च शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांचा कोणताही अधिकार फेटाळून लावण्यात येत आहे व अशा विचारांचासुद्धा तीव्र धिक्कार करण्यात येत आहे. **उच्च शिक्षण खात्याच्या उपरोक्त आकसपूर्ण धोरणामुळे महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाला आंदोलन तीव्र करण्याचा कार्यक्रम घोषित करावा लागत आहे याचे या महासंघाला मनापासून दुःख होत असले तरी याशिवाय कोणताही पर्याय उरलेला नसल्यानेच हा कार्यक्रम घोषित करण्यात येत आहे.**

**१३.** दिनांक १३ जानेवारी २०१३ च्या या ठरावामध्ये पुढीलप्रमाणे आंदोलन तीव्र करण्याचा निर्णय घोषित करण्यात आला होता. :-

**"सोमवार, दिनांक ४ फेब्रुवारी २०१३ या दिवसापासून सर्व विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षक विद्यापीठामार्फत संचालित केल्या जाणाऱ्या विद्यापीठीय व महाविद्यालयातील परीक्षेच्या कोणत्याही कामाशी संपूर्णपणे असहकार करतील."**

**१४.** दिनांक १३ जानेवारी २०१३ रोजी महासंघाच्या कार्यकारी मंडळाने संमत केलेल्या ठरावामध्ये थकबाकी अदा करण्याबाबत उच्च शिक्षणमंत्री व मुख्यसचिव यांच्याशी झालेल्या चर्चेनंतर जे मतैक्यपत्र स्वाक्षरीत झाले होते त्याची आठवण करून देऊन असे नमूद करण्यात आले होते की, "केंद्र शासनाने पाठविलेल्या विद्यापीठीय व महाविद्यालयातील शिक्षकांच्या वेतन सुधारणा विषयीची समग्र योजना राज्य शासनाने विचारात घेऊन **त्याबाबतचा शासननिर्णय दिनांक १२.८.२००९ रोजी निर्गमित केला.** या योजनेची अंमलबजावणी करतांना केंद्र शासनाकडून ८० टक्के अर्थसहाय्य मिळावे असे उद्दीष्ट राहील. हे अर्थसहाय्य केंद्र शासनाकडून **न मिळाल्यास ८० टक्के थकबाकीची रक्कम राज्य शासन, राज्य शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे देईल.**" या आश्वासनाची कोणतीही अंमलबजावणी करण्यात आली नाही. ..... एक रुपयाचे अनुदान मिळत नसतांना १७ लाख कर्मचारी, शिक्षक व सेवानिवृत्त प्राध्यापकांना ८० टक्के थकबाकी आतापर्यंत अदा करण्यात आलेली असतांना व येथे ८० टक्के अनुदान केंद्र शासन देत असतांना, कार्यरत मा. कुलगुरु, प्रकुलगुरु, विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांना सातत्याने अवमानित केले जात आहेत."

**१५.** महाराष्ट्रातील सर्व प्राध्यापकांना मागे वळून पाहतांना आज या गोष्टीचे आश्चर्य वाटते की, १३ जानेवारी २०१३ रोजी आंदोलन तीव्र करण्याचा महासंघाचा निर्णय जाहीर झाल्यावरसुद्धा संपूर्ण जानेवारी महिन्यात राज्यशासनातर्फे कोणतीही हालचाल झाली नाही. ४ फेब्रुवारी २०१३ रोजी प्रत्यक्ष परीक्षा बहिष्कार आंदोलन सुरू झाल्यावर ५ व ६ फेब्रुवारी २०१३ रोजी महासंघाला चर्चेसाठी बोलाविण्यात आले. मा. मुख्यमंत्र्यांच्या 'वर्षा' या निवासस्थानी महासंघाच्या कार्यकारी मंडळाशी ही जी चर्चा आयोजित करण्यात आली होती. त्या चर्चेमध्ये **मुख्यमंत्री श्री.पृथ्वीराज चव्हाण यांनी सरळ सरळ अशी भूमिका घेतली की, "थकबाकीची सर्व रक्कम राज्यशासनाने एकरकमी अदा करावी अशी केंद्राची भूमिका आहे**, त्यानंतरच ते परतावा देतील. अशा स्थितीमध्ये थकबाकीची एवढी मोठी रक्कम राज्यशासनाला देता येणार नाही याचे कारण केंद्राची आर्थिक स्थिती फार अडचणीची आहे. मी स्वतः मा.पंतप्रधानांच्या कार्यालयामध्ये राज्यमंत्री होतो. एवढी मोठी रक्कम केंद्रशासन देऊ शकेल हे शक्य वाटत नाही." त्यावर मी स्वतः या चर्चेमध्ये त्यांना असे सांगितले की, "दुसऱ्या, तिसऱ्या, चौथ्या व पाचव्या वेतन आयोगाच्या वेळी केंद्राने कबूल केलेला थकबाकीचा हिस्सा केंद्रशासनाने राज्यांनी प्रस्ताव सादर केल्यानंतर यापूर्वी अदा केलेला आहे असा आमचा अनुभव आहे. तेव्हा आजच आता सहाव्या वेतन आयोगाच्या वेळी केंद्रशासन आपला हिस्सा देणार नाही असे गृहीत धरून काम करणे योग्य होणार नाही." त्या उपर सुद्धा मा.मुख्यमंत्री श्री.पृथ्वीराज चव्हाण यांनी असे सांगितले की, "**केंद्राकडून किती दिवसात आम्हाला परतावा मिळेल हेही त्यांनी पत्रात सांगितलेले नाही.** केंद्रशासन आर्थिक अडचणीत असल्यामुळे त्यांच्याकडून निधी मिळेल अशी शक्यता अजिबात दिसत नाही. निधी किती दिवसात देऊ हेही त्यांच्या पत्रामध्ये स्पष्टपणे नमूद नाही." "राज्यशासन एकरकमी एवढी मोठी रक्कम देऊ शकत नाही." त्यामुळे १५२६ कोटी रुपयांच्या थकबाकीपैकी ५०० कोटी रुपयांचा पहिला हप्ता आम्ही मार्च

***सहाव्या वेतन आयोगाच्या वेळी फक्त १४ राज्यांना केंद्रशासनाचे पूर्ण अर्थसहाय्य मिळू शकले ही वस्तुस्थिती राज्यसभेत स्पष्ट झालेली असतांना त्यावेळी महाराष्ट्रामध्ये या महासंघाने दाखल केलेल्या शपथपत्रानंतर मा. उच्च न्यायालयाने दिनांक १० मे २०१३ रोजी दिलेल्या निर्णयामुळे केंद्रशासनाचे अर्थसहाय्य मिळू शकले. हा ऐतिहासिक घटनाक्रम महाराष्ट्रातील शिक्षक विसरू शकत नाहीत.***

( महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाच्या ५ सप्टेंबर २०१८ ठरावाचा परिच्छेद ८ पहा. )

२०१३ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात तरतूद करून वितरित करू. त्याची प्रतिपूर्ती केंद्राकडून झाली की, मग दुसरा हप्ता देण्यासाठी तरतूद करू. दुसऱ्या हप्त्याची प्रतिपूर्ती झाली की, मग तिसरा हप्ता अदा करू" अशी भूमिका त्यांनी मांडली.

**१६. त्यावर महासंघातर्फे या बैठकीत अशी भूमिका मांडण्यात आली की, "५०० कोटी रुपयांचा पहिला हप्ता दिल्यावर त्याची प्रतिपूर्ती केंद्रशासन करेल अशी अपेक्षा करणे संपूर्णपणे चुकीचे आहे** कारण त्यांच्या कॅबिनेटने घेतलेल्या निर्णयानुसार त्यांनी जो शासननिर्णय काढलेला आहे, त्यामध्ये स्पष्टपणे नमूद आहे की, सर्व थकबाकी एकमुस्त अदा केल्यानंतर आमच्याकडे प्रतिपूर्तीसाठी राज्यशासनाने प्रस्ताव पाठवावा." "केंद्रशासन निधी देणारे आहे. महाराष्ट्र शासन निधी घेणारे आहे. त्यांच्या अटींबाबतचा ठराव त्यांच्या कॅबिनेटमध्ये मंजूर झालेला आहे तुमच्या मंत्रिमंडळामध्ये तुम्हाला ठराव करावयाचा आहे. "केंद्राकडून निधी आला नाही तर राज्यशासन ही थकबाकी स्वतः देईल" असे तुम्ही आम्हाला लेखी कबूल केलेले आहे. आज निधी केंद्राकडून उपलब्ध होत आहे तर त्यांच्या अटींचे आपल्याला पालन करावेच लागेल" अशीही भूमिका ठामपणे या बैठकीत महासंघातर्फे मांडण्यात आली.

**१७.** दिनांक ५ व ६ फेब्रुवारी २०१३ रोजी मा.मुख्यमंत्र्यांशी झालेल्या या चर्चेमध्ये महासंघातर्फे आणखी एक महत्त्वपूर्ण मुद्दा मांडण्यात आला.

उत्तरप्रदेश विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षक संघाचे समन्वयक डॉ.हृदयनाथ त्रिपाठी विरुद्ध उत्तर प्रदेश शासन या प्रकरणात (No. 64068 of 2011) एक महत्वपूर्ण निर्णय दिनांक १३ जानेवारी २०१३ रोजी झालेला होता. उत्तर प्रदेश शासनाने "**केंद्राकडून निधी आल्यावर आम्ही थकबाकी** देऊ" असे आदेश २१ ऑगस्ट २०११ रोजी काढले होते. **उत्तर प्रदेश शासनाचा हा आदेश मा. उच्च न्यायालयाने रद्दबादल ठरविला व एकमुस्त थकबाकी देण्याचे पुढील शब्दात आदेशित केले.**:- "In view of the aforesaid facts, we are of the view that the **stand taken by the State Government in the impugned order is wholly erroneous and cannot be sustained.** The proper course available to the State Government is first to pay the amount pursuant to the recommendations of the UGC, which admittedly has been accepted by the State Government and thereafter shall apply to the Central Government for reimbursement of the amount so incurred towards the payment of arrears of salary. **For the reasons aforesaid, the impugned order dated 21.8.2011 is liable to be quashed. Accordingly, impugned order dated 21.8.2011 is hereby quashed.** The State Government is directed to release the necessary fund for payment of arrears of salary of teachers of National Post Graduate College, Barhalganj, Gorakhpur within a maximum period of one month, from the date of receipt of certified copy of this order."

**१८. महासंघातर्फे हायकोर्टाचा निर्णय समजावून सांगण्याचा बराच प्रयत्न करण्यात आला पण मा.मुख्यमंत्री श्री. पृथ्वीराज चव्हाण ऐकून घ्यायला तयारच नव्हते.** तसे शब्द त्यांनी वापरले नाही पण एकंदर त्यांची देहबोली अशी होती की, "ते हायकोर्टाच वगैरे मला काही सांगू नका. काय तुम्हाला त्यावर कोर्टकचेरी करावयाची असेल ती तुम्ही करून घ्या." त्यांच्याच पक्षाचे केंद्रसरकार आणि त्यांच्याच पक्षाचे पंतप्रधान व केंद्रीय मानव संसाधन मंत्री असतांना १५०० ते १६०० कोटी रुपयांचे केंद्राचे अनुदान घेण्यासाठीच्या केंद्रशासनाच्या सूचना मान्य करायला ते तयार नव्हते व "५०० कोटींचा पहिला हप्ता आम्ही देऊ" हा हेका ते धरून बसले होते.

**१९.** शब्दात मुख्यमंत्री तसे बोलले नाहीत. पण पूर्वीचे मा.मुख्यमंत्री श्री.अशोकराव चव्हाण व मा.उच्च शिक्षण मंत्री श्री. राजेशजी टोपे यांनी राज्याच्या मुख्य सचिवांना मध्ये घालून थकबाकी अदा करण्याबाबतचे जे लेखी आश्वासन महासंघाला दिले होते ती गोष्ट त्यांना आवडलेली नव्हती. राज्यशासनाचे हित व्हावे यादृष्टीने एखाद्या गोष्टीचा आग्रह धरणे ही गोष्ट वेगळी पण मा.मुख्यमंत्री श्री. पृथ्वीराज चव्हाण यांनी थकबाकी अदा करण्याबाबत जी भूमिका घेतली होती ती केवळ शिक्षकांच्या विरोधातच नव्हती तर शिक्षक या वर्गाविषयी ओतप्रोत द्वेषाने भरलेली होती व त्यामुळेच ते "केंद्रशासन निधी देऊ शकणार नाही, केंद्रशासनाची आर्थिक स्थिती बरोबर नाही" अशी अत्यंत चुकीची भूमिका कवटाळून बसले होते. चर्चेमध्ये एकवेळ अशी आली की, मुख्यमंत्री तेच ते बोलत होते व त्यावर महासंघाचे प्रतिनिधी आपले तेच ते म्हणणे मांडत होते. शेवटी महासंघातर्फे "**आजच्या चर्चेचे जे काय कार्यवृत्त असेल ते आम्हाला द्या म्हणजे मग आम्हाला त्याबाबत निश्चित भूमिका घेता येईल**" असे सांगण्यात आले व तेथेच ती चर्चा संपली.

**२०.** परीक्षा बहिष्कार आंदोलन सुरूच होते. त्यामुळे त्यातल्या त्यात लवकर म्हणजे ९ फेब्रुवारी २०१३ रोजी "**मा. मुख्यमंत्री यांच्या कडे दि.६.२.२०१३ रोजी एमफुक्टो या शिक्षकसंघटनेसमवेत झालेल्या बैठकीचे कार्यवृत..**" या मथळ्याचे कार्यवृत्त महासंघाच्या अध्यक्षांना उच्च शिक्षण विभागाच्या पत्रान्वये प्राप्त झाले. यामध्ये थकबाकी अदा करण्याबाबत पुढील मजकूर होता.

"(१) (i) राज्यातील अकृषी विद्यापीठे व संलग्नित शासकीय व अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील शिक्षक व समकक्ष पदांना सहाव्या वेतन आयोगानुसार लागू करण्यात आलेल्या सुधारित वेतन संरचनेनुसार दिनांक १.१.२००६ ते दिनांक ३१.३.२०१० या कालावधीतील वेतन फरकाच्या थकबाकीची केंद्र शासनाच्या हिश्याची (८० टक्के) रुपये १५२६.५० कोटी इतकी रक्कम अनुज्ञेय आहे.

(ii) केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालयाच्या दि. ३१.१२.२००८ च्या आदेशामध्ये उक्त ८० टक्के रक्कम केंद्रीय अर्थसहाय्य म्हणून राज्य शासनास देण्यात येईल असे स्पष्ट केले होते. **तथापि, दि. १४.०८.२०१२ च्या पत्रान्वये मात्र वरील ८० टक्के रक्कम प्रथम राज्य शासनाने अदा करावी. त्यानंतर सदर रक्कमेची प्रतिपूर्ती २ ते ३ हप्त्यामध्ये राज्य शासनास करण्यात येईल असे कळविले आहे.** सदर २ ते ३ हप्त्यातील रक्कम किती कालावधीत राज्य शासनास अदा करण्यात येईल, त्याबाबत केंद्र शासनाच्या पत्रात कोणतेही भाष्य केले नाही. **तसेच केंद्र शासनाने दि. १४.११.२०१२ च्या पत्रान्वये संबंधित अध्यापकांना केंद्र शासनाच्या ८० टक्के हिस्स्याची रक्कम अदा केल्याचे प्रमाणपत्र सादर करण्यास सांगितले आहे.**

(iii) केंद्र शासनाचे वरील धोरण विचारात घेता सदर रु. १५२६.५० कोटी इतक्या रक्कमेपैकी रुपये ५००.०० कोटी इतक्या रक्कमेचा पहिला हप्ता मार्च, २०१३ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात तरतूद करून वितरीत करण्यात येईल.

(iv) तदनंतर सदर रक्कमेची प्रतिपूर्ती करण्यासाठी केंद्र शासनाकडे प्रस्ताव सादर करण्यात येईल व **केंद्र शासनाकडून जेवढ्या रक्कमेची प्रतिपुर्ती होईल, तेवढी रक्कम राज्य शासनाकडून दुसरा हप्ता देण्यासाठी आगामी अधिवेशनात तरतुद करून सदर रक्कम वितरीत करण्यात येईल.**

(v) त्याचप्रमाणे राज्य शासनाने अदा केलेल्या दुसऱ्या हप्त्याची प्रतिपूर्ती करण्यासाठी केंद्र शासनाकडे प्रस्ताव सादर करण्यात येईल व **केंद्र शासनाकडून जेवढ्या रक्कमेची प्रतिपूर्ती होईल तेवढी रक्कम राज्य शासनाकडून तिसरा हप्ता देण्यासाठी आगामी अधिवेशनात तरतूद करून सदर रक्कम वितरीत करण्यात येईल.**

(vi) वरील पद्धतीने थकबाकीची रु. १५२६.५० कोटी इतकी रक्कम अध्यापकांना अदा करण्यात येईल."

**२१.** दिनांक ६ फेब्रुवारीच्या बैठकीचे जे एकतर्फी कार्यवृत्त काढण्यात आले त्यामध्ये महासंघातर्फे जी मांडणी करण्यात आली होती त्यातील एक शब्दही नमूद करण्यात आला नव्हता. फक्त मुख्यमंत्र्यांचे म्हणणे तेवढे चांगल्यातल्या चांगल्या शब्दात नमूद करण्यात आले होते. उपरोक्त कार्यवृत्तातील थकबाकीबाबतच्या परिच्छेद १ मध्ये नमूद असलेला भाग काळजीपूर्वक पाहिला तर उपपरिच्छेद (i) व (ii) मध्ये केंद्रशासनाचे आदेश विदित केलेले आहेत व ते आदेश विचारात घेऊन राज्यशासनाने काय निर्णय घेतलेले आहे हे उपपरिच्छेद (iii) ते (vi) मध्ये नमूद करण्यात आलेले आहे. वरवर जरी वाचले तरी केंद्रशासनाने जे द्यायचे ठरविले आहे ते आम्ही न देण्याचे ठरविले आहे असा अर्थ त्यातून अगदी सहजपणे लक्षात येत होता.

**२२.** थकबाकीबाबत कळविण्यात आलेला हा निर्णय अत्यंत पोरकटपणाचा होता. त्यावर प्रतिक्रिया देण्यासाठी महासंघाने घाई न करता तपशीलवार प्रतिक्रिया देण्याचे ठरविले. दिनांक ६ मार्च २०१३ रोजीच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत याबाबतचा निर्णय झाला. वृत्तवाहिन्या व वृत्तपत्रांना मुलाखती देतांना मा. उच्च शिक्षण मंत्री "पाचशे कोटी रुपयांचा पहिला हप्ता मार्च २०१३ अखेर, तेवढाच दुसरा भाग जून २०१३ अखेर व तेवढाच तिसरा भाग जुलै २०१३ अखेर पर्यंत अदा केला जाईल" असे सांगत सुटले. **मात्र तसा उल्लेख थकबाकी बाबतचा शासनाचा निर्णय समाविष्ट असलेल्या अधिकृत शासकीय कार्यवृत्तामध्ये मात्र नमूद नव्हता.** दुसऱ्या व तिसऱ्या हप्त्याची गोष्ट स्वतः उच्च शिक्षण मंत्री 'जनरल नॉलेज'च्या आधारे बोलत होते. मंत्रिमंडळात दुसऱ्या व तिसऱ्या हप्त्याबाबत निर्णय झालेला नव्हता. फक्त पहिला हप्ता देण्याबाबतच निर्णय

झाला होता, ही गोष्ट अधिकृत कागदपत्रातून उघड झाली. दिनांक ८ मार्च २०१३ रोजी जेल भरो आंदोलनानंतर ७ मार्च २०१३ तारखेचे एक शासकीय पत्र महासंघाच्या अध्यक्षांना प्राप्त झाले. त्या मध्ये थकबाकी अदा करण्याबाबत पुढील प्रमाणे उल्लेख होता. :- "मा. मुख्यमंत्री, मा. उपमुख्यमंत्री, मा. मंत्री उच्च व तंत्रशिक्षण तसेच शिक्षक संघटनेच्या प्रतिनिधीसोबत दि. ६.२.२०१३ रोजी झालेल्या बैठकीत थकबाकी पोटी अदा करावयाच्या **अनुषंगाने रु. ५०० कोटीचा पहिला हप्ता मार्च २०१३ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात तरतूद करून वितरीत करण्यात येईल असा निर्णय घेण्यात आला आहे.**"

**२३.** दिनांक ६ फेब्रुवारी २०१३ रोजीच्या मा.मुख्यमंत्र्यांच्या बैठकीचे कार्यवृत्त, दिनांक ६ मार्च २०१३ च्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत झालेला निर्णय कळविणारे ७ मार्च २०१३ रोजीचे पत्र या सर्व बाबी महासंघाच्या कार्यकारी मंडळाने आपल्या दिनांक ९ मार्च २०१३ रोजी झालेल्या बैठकीत विचारात घेतल्या व त्यावर एक तपशीलवार ठराव मंजूर केला. त्या ठरावातील थकबाकीबाबतचा भाग पुढीलप्रमाणे :-

"**थकबाकी अदा करण्याबाबत :- "हे 'अशा प्रकारे' केले तरच आम्ही ८० टक्के थकबाकी देऊ ही केंद्राची व्यवस्था सांगायची व त्यापाठोपाठच केंद्र शासनाचे हे धोरण लक्षात घेता आम्ही 'तशाप्रकारे' न करावयाचे ठरविले आहे.**" असा निर्णय कळवावयाचा हे व्याघाताचे दुसरे उदाहरण आहे. "केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालयाने ..... **दि. १४.०८.२०१२ च्या पत्रान्वये वरील ८० टक्के रक्कम प्रथम राज्य शासनाने अदा करावी. त्यानंतर सदर रक्कमेची प्रतिपूर्ती २ ते ३ हप्त्यामध्ये राज्य शासनास करण्यात येईल असे कळविले आहे. ....तसेच केंद्र शासनाने दि. १४.११.२०१२ च्या पत्रान्वये संबंधित अध्यापकांना केंद्र शासनाच्या ८० टक्के हिस्स्याची रक्कम अदा केल्याचे प्रमाणपत्र सादर करण्यास सांगितले** आहे. ..... **केंद्र शासनाचे वरील धोरण विचारात घेता** सदर रु. १५२६.५० कोटी इतक्या रक्कमेपैकी रुपये ५००.०० कोटी इतक्या रक्कमेचा पहिला हप्ता मार्च, २०१३ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात तरतूद करून वितरित करण्यात येईल" पहिल्या वाक्यात केंद्राची योजना सांगायची, **दुसऱ्या वाक्यात केंद्राचे वरील धोरण विचारात घेऊन राज्यशासनाने पुढील निर्णय घेतला आहे असे म्हणायचे** व त्यानंतर केंद्राच्या योजनेच्या विरोधातील व्यवस्थेला जन्मास घालावयाचे. "**हे 'अशा प्रकारे' केले तरच आम्ही ८० टक्के थकबाकी देऊ ही केंद्राची व्यवस्था सांगून, त्यापाठोपाठच केंद्र शासनाचे हे धोरण लक्षात घेता आम्ही 'तशाप्रकारे' न करावयाचे ठरविले आहे." हा व्याघात आपला घात करणारा आहे, हे उघड्या डोळ्यांना समोर दिसत असतांनाहि आपल्याला ही थकबाकी केंव्हा ना केंव्हा मिळेलच यावर भरवसा ठेवण्याचा भाबडेपणा महाराष्ट्रातील प्राध्यापकांनी करावा अशी अपेक्षा करणे सुद्धा चूकच आहे.**

"**अलंकार प्रदीप**" या ग्रंथाच्या कर्त्यांनी व्याघात अलंकाराची उदाहरणे देताना "एक गृहस्थ आपली ओळख सांगतांना म्हणाला "मी जन्मभर मौनव्रत पाळतो; माझा पिता ब्रम्हचारी होता; माता वांझ होती; आणि आजा निपुत्रिक वारला." असे पहिलेच उदाहरण नमूद केले आहे. उद्याच्या ग्रंथकर्त्यांना व्याघाताची दोन सुंदर उदाहरणे पुरवून उच्च शिक्षण विभागातील नोकरशाहीने साहित्याची फार मोठी सेवा केली आहे असेच कोणीही म्हणेल."

**२४.** अशारितीने अर्धवटपणे प्रस्ताव सादर करणाऱ्या कोणत्याही राज्याला केंद्रशासनाकडून पूर्ण अनुदान उपलब्ध झाले नाही व अशा राज्यांची संख्या २०१८ साली १५ होती ही गोष्ट दिनांक ९ ऑगस्ट २०१८ रोजी राज्यसभेमध्ये तारांकित प्रश्न क्रमांक २४१ ला मानव संसाधन मंत्र्यांनी दिलेल्या उत्तरातून स्पष्ट झाली. पण अधिकृत कागदपत्रांच्या अभ्यासावर आधारित भूमिका घेणाऱ्या महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाला २०१३ मध्ये "**महाराष्ट्र शासनाचा थकबाकी अदा करण्याचा प्रस्ताव हा थकबाकी अदा न करण्याचा प्रस्ताव आहे**" हे ठामपणे ठाऊक होते व त्यामुळेच महासंघाने महाराष्ट्र शासनाचा थकबाकी अदा करण्याचा प्रस्ताव फेटाळून लावला व आंदोलन ठामपणे सुरू ठेवण्याचा निर्णय घेतला. सुडबुद्धीची कारवाई म्हणून मुख्यमंत्री श्री. पृथ्वीराज चव्हाण यांच्या नेतृत्त्वाखालील शासनाने दोन निर्णय घेतले.

परीक्षेच्या कामासाठी मेहनताना (Remuneration) दिल्या जातो. वेतन ज्या कामासाठी दिले जाते त्यात परीक्षेचे काम समाविष्ट नसते याची माहिती असतांना या शिक्षकांचे वेतन रोखून धरा असे आदेश शासनाने काढले **ही पहिली सुडबुद्धीची कारवाई** व त्यातून पुढे ७०-७१ दिवसाचे वेतन गोठविण्याची समस्यासमोर आली. **दुसरे सुडबुद्धीचे कृत्य** म्हणजे परीक्षेच्या कामाबाबतीत विद्यापीठांना कारवाई करण्याचे अधिकार असल्यामुळे विद्यापीठांनी "कारणे दाखवा नोटीसा काढाव्यात" असे आदेश विद्यापीठांना देण्यात आले. त्याप्रमाणे काही विद्यापीठांनी तशा नोटीसा काढल्या. सहाव्या वेतन आयोगापोटीची सर्वच थकबाकी बुडविण्याचा डाव या कृत्यामागे आहे याची स्पष्ट जाणीव असल्यामुळे विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांच्या मनोधैर्यावर याचा अजिबात परिणाम झाला नाही. उलट सुडबुद्धीच्या कारवाईमुळे शिक्षके तिव्रतेने पेटून उठल्याची स्थिति महाराष्ट्रामध्ये निर्माण झाली.

**२५.** या आंदोलनामध्ये एका बाजूला राज्यशासनातर्फे प्राध्यापकांना दोष देण्यात येत होता तर दुसऱ्या बाजूला केंद्रशासनाविषयी अफवा उठविल्या जात होत्या. हस्तेपरहस्ते महाराष्ट्रावर आलेल्या या संकटाला केंद्रसरकार जबाबदार आहे अशी भावना पसरविण्याचा प्रयत्न राज्यशासनातील काही शीर्षस्थ नेते करीत होते. केंद्रसरकारची आर्थिक स्थिती ही काही फार चांगली नाही, त्यामुळे त्यांच्याकडून वेळेवर परतावा मिळेल असे सांगता येत नाही असे स्वतः मुख्यमंत्री सांगत फिरत होते. "सदर रक्कम किती कालावधीत राज्यशासनाला अदा करण्यात येईल त्याबाबतीत केंद्रशासनाच्या पत्रात कोणतेही भाष्य केलेले नाही" असे राज्यशासनाने महासंघाला लेखी कळविले होते. या अफवा हस्तेपरहस्ते केंद्रशासनातील नेत्यांच्या कानावरसुद्धा गेलेल्या होत्या.

**२६.** केंद्रीय मंत्रिमंडळातील ज्येष्ठ नेते श्री. शरदराव पवार यांच्या कानावर ज्या वेळेला या बातम्या गेल्या तेव्हा त्यांनी त्याची अत्यंत गांभीर्याने दखल घेतली व केंद्रशासनाचे उत्तरदायित्व प्रभावीपणे व परिणामकारकरित्या पार पाडले जाईल असा निर्णय घेतला व तितक्याच प्रभावीपणे व परिणामकारकपणे तो जाहिर केला. नवी दिल्ली येथे त्यांच्या निवासस्थानी ते स्वतः व केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्री श्री.डॉ.एम.पल्लमराजू यांची बैठक आयोजित करण्यात आली. या दोन उभय ज्येष्ठ मंत्र्याशिवाय राज्याचे उच्च शिक्षण विभागाचे प्रधान सचिव श्री. संजीव कुमार व मनुष्यबळ विकास मंत्रालयाचे सचिव श्री. अशोक ठाकूर हे या बैठकीला उपस्थित होते. या बैठकीचे कार्यवृत्त अधिकृतपणे महाराष्ट्र शासनाच्या माहिती व जनसंपर्क संचालनालयाच्या अंतर्गत काम करणाऱ्या नवी दिल्ली येथील महाराष्ट्र परिचय केंद्रामार्फत दिनांक १ एप्रिल २०१३ रोजी प्रसिद्ध करण्यात आले. "**प्राध्यापकांच्या थकबाकी वेतनाचा गुंता : पवार - पल्लमराजू यांच्या बैठकीत सुटला. १५०० कोटी रुपयांचा निधी देण्याचा निर्णय**" या मथळ्याचे एक अधिकृत पत्रक महाराष्ट्र परिचय केंद्रातर्फे प्रसिद्ध करण्यात आले. त्यातील पहिलाच परिच्छेद पुढीलप्रमाणे होता :-

"नवी दिल्ली, दि. १ एप्रिल : गेल्या दोन महिन्यांपासून महाराष्ट्रात सुरू असलेल्या प्राध्यापकांच्या संपावर तोडगा काढण्यासाठी केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्री डॉ. एम्. पल्लमराजू यांनी सोमवारी ६ व्या वेतन आयोगातील थकबाकीसाठी केंद्राचा ८० टक्के वाटा तातडीने देण्याचा निर्णय जाहीर केला. त्यानुसार १५०० कोटी रुपये केंद्रातर्फे दिले जाणार आहेत. केंद्रीय कृषी मंत्री शरद पवार यांनी राज्यातील हा गुंता सोडविण्यासाठी त्यांना आपल्या ६ जनपथ या निवासस्थानी निमंत्रित केले होते. प्राध्यापकांनी विद्यार्थ्यांचे नुकसान होणार नाही याची काळजी घेत संप मागे घ्यावा, असे आवाहनही उभय नेत्यांनी केले."

**२७.** केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्र्यांचा हा महत्त्वपूर्ण निर्णय या प्रसिद्धी पत्रकाच्या दुसऱ्या परिच्छेदात पुढील शब्दांमध्ये नमूद करण्यात आला होता :-

"महाराष्ट्रात गेल्या ५६ दिवसांपासून प्राध्यापकांचा संप सुरू आहे. प्राध्यापकांच्या प्रमुख मागण्यांमध्ये ६ व्या वेतन आयोगानुसार मिळणारी थकबाकी देण्यात यावी आणि बिगर नेट सेट अध्यापकांना त्यांच्या नियुक्ती पासून सेवाशर्ती देण्यात याव्यात याचा समावेश आहे. यापैकी पहिल्या मागणीवर **केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्री डॉ. एम्.पल्लमराजू यांनी स्पष्ट केले की, केंद्र शासन राज्य शासनाला एकूण वेतन रकमेतील १५०० कोटीचा मोबदला देण्यास तयार आहे. महाराष्ट्र शासनाने निधी मंजूर केल्याबरोबर १५०० कोटीची अर्थात ८० टक्के केंद्राची मदत जारी केली जाईल.**"

**२८.** केंद्रीय कृषीमंत्री श्री. शरदराव पवार यांनी दिलेली माहितीसुद्धा या अधिकृत पत्रकात पुढील शब्दात नमूद होती. :-

"कृषीमंत्री शरद पवार यांनी यावेळी बोलताना, राज्याचे मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी राज्याने थकबाकीसाठी सध्या ५०० कोटी रुपयांची तरतूद केली असल्याचे आपणास कळविले असल्याचे सांगितले. राज्य शासनाच्या वतीने ही माहिती मनुष्यबळ विकास मंत्र्यांना आपण दिली असल्याचेही त्यांनी पत्रकारांशी बोलताना स्पष्ट केले. त्यामुळे राज्य शासनाकडून पुढाकार घेण्यात आला आहे. केंद्रही मोबदल्याची रक्कम राज्याला देणार आहे. त्यामुळे प्राध्यापकांच्या थकबाकीचा महत्त्वाचा गुंता निकाली निघाला आहे."

**२९.** महाराष्ट्र शासनाच्या अधिकृत परिचय केंद्रातर्फे हे प्रसिद्धी पत्रक वृत्तपत्रांना पाठविण्यात आले. त्यासोबत अधिकृतपणे "केंद्रीय कृषी मंत्री शरद पवार आणि केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्री डॉ. एम्. पल्लमराजू राज्यातील प्राध्यापकांच्या संपाबाबत चर्चा करतांनाचा फोटो सोबत जोडला आहे" असे

नमूद करण्यात आले होते.

**३०.** उभय केंद्रीय मंत्र्यांची दिल्ली येथे जी बैठक झाली त्या बैठकीतून निर्माण झालेल्या परिस्थितीचा आढावा महासंघाच्या कार्यकारी मंडळाने दिनांक ७ एप्रिल २०१३ रोजी जळगाव येथे झालेल्या बैठकीत घेतला. त्याविषयीच्या ठरावातील पहिलाच परिच्छेद पुढीलप्रमाणे होता :-

"देशाच्या मा. कृषीमंत्र्यांनी स्वतः याबाबतीत वेळ काढून व लक्ष घालुन केंद्रीय मनुष्यबळ विकासमंत्री डॉ. एम्. पल्लम राजू यांना आपल्या निवासस्थानी चर्चेसाठी निमंत्रित केले. ही जी बैठक झाली त्या बैठकीचे चित्रवाहिन्यावर आलेले वृत्त व या बैठकीचे अधिकृतपणे प्रसारित करण्यात आलेले वृत्तपत्रीय प्रसारण यांचे काळजीपूर्वक अवलोकन केल्यास पुढील बाबी ठळकपणे समोर येतात. :-

(१) थकबाकी अदा करण्याबाबतचा केंद्र शासनाचा १४ ऑगस्ट २०१२ चा जो शासननिर्णय आहे तो केंद्रीय मंत्रिमंडळाच्या निर्णयावर आधारित असल्यामुळे त्यामध्ये कोणताही बदल केला जाणार नाही.

(२) १४ ऑगस्टच्या शासननिर्णयाप्रमाणे प्रथम राज्य शासनाने थकबाकी अदा करावयाची असून त्यापैकी ८० टक्के रक्कम परताव्याच्या स्वरुपात केंद्र शासनाकडून अदा केली जाईल. **राज्यशासनाने निधी अदा केल्यावर ८० टक्के केंद्राची मदत जारी केली जाईल.** असे या अधिकृत वृत्तपत्रीय प्रसारणामध्ये स्पष्टपणे नमूद आहे."

**३१.** राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी केंद्रशासनावर गैरभरवसा दाखवावा असे आता काहीही शिल्लक राहिलेले नाही ही गोष्ट जळगावच्या ठरावात स्पष्टपणे पुढील शब्दात नमूद करण्यात आली होती. :-

"**१.३** मा. केंद्रीय कृषीमंत्र्यांनी आयोजित केलेल्या या उपरोक्त बैठकीनंतर राज्य शासनाने आता केंद्र शासनावर गैरभरवसा दाखविण्याचे कोणतेही कारण शिल्लक उरलेले नाही. दुसऱ्या, तिसऱ्या व चौथ्या वेतन आयोगाच्या वेळी केंद्राने ८० टक्के रक्कम दिली नाही असे यापूर्वी कधीही घडलेले नाही. "केंद्र शासनावर गैरभरवसा करणाऱ्या थकबाकी अदा करण्याच्या कोणत्याही व्यवस्थेवर भरवसा ठेवण्यास दृढ नकार देण्याचा निर्धार हे कार्यकारी मंडळ व्यक्त करीत आहे." असा ठराव या कार्यकारी मंडळाने यापूर्वीच संमत केला असून तसे यापूर्वी राज्यशासनाला कळविण्यात आले आहे. **ज्येष्ठ अशा उभय दोन मा.केंद्रीय मंत्र्यांच्या या बैठकीनंतर राज्य शासनातर्फे संघटनेला याबाबतीत आजपावेतो राज्य शासनाचा निर्णय म्हणून काहीही कळविण्यात आलेले नाही हे खेदपूर्वक नमूद करण्यात येत आहे.**"

**३२.** दिनांक ७ एप्रिल २०१३ रोजी जळगाव येथे झालेल्या बैठकीतील ठरावामध्ये उभय केंद्रीय मंत्र्यांचे आभार मानण्यात आले होते व राज्यशासनाने मात्र अजून काहीही कळविले नाही याबद्दल खेद व्यक्त करण्यात आला होता. ठरावातील तो भाग पुढीलप्रमाणे :-

"**२.४** उपरोक्त दोनही प्रश्नांच्या बाबतीत केंद्र शासनाच्या पातळीवर कोणतीही बाब आता 'पेंडींग' राहिलेली नाही. ज्येष्ठ नेते व केंद्रीय कृषीमंत्री श्री. शरदराव पवार व केंद्रीय मानव संसाधन मंत्री श्री. एम्. पल्लम राजू यांनी उपरोक्त बैठक घेवून **या दोनही प्रश्नांना जी गती दिली त्याबद्दल मनापासून आभार व्यक्त करीत असतांना त्या बैठकीनंतर महाराष्ट्र शासनाच्या पातळीवर झालेला (झाला असल्यास) कोणताही निर्णय संघटनेला कळविण्यात आलेला नाही हे खेदपूर्वक नमूद करण्यात येत आहे.**"

**३३.** याच दरम्यानच्या काळात प्राध्यापकांच्या आंदोलनाला 'ईस्मा' लावण्याच्या बातम्या शासनातर्फे पसरविल्या जात होत्या. मुळात राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री श्री. पृथ्वीराज चव्हाण हे लेखी दिलेला शब्द पाळत नाहीत असा ठाम निष्कर्ष काढता येईल अशी अधिकृत कागदपत्रे महासंघाजवळ उपलब्ध होती व ती त्यांनी छापून राज्यभर वाटलेली होती. त्यामुळे जळगावच्या महासंघाच्या कार्यकारी मंडळामध्ये झालेल्या ठरावाचा शेवटचा परिच्छेद पुढीलप्रमाणे होता:-

"दंडशक्तीचा विधिमय वापर करण्याचा एकाधिकार ज्या शासनाला कायद्यानेच बहाल केलेला आहे, त्या शासनाने शिक्षक कर्मचाऱ्यांचे आंदोलन किंवा कोणतेही आंदोलन मोडून काढण्यासाठी फसवणूक आणि विश्वासघात या मार्गाचा वापर करण्याचा निर्णय घेतला असेल तर लोकशाही व्यवस्थेमध्ये ती गोष्ट अत्यंत निकृष्ट व टाकावू समजल्या गेली पाहिजे. राज्याच्या मा. मुख्यमंत्र्यांनी दिनांक २ मे २०१२ रोजीच्या बैठकीमध्ये जे लेखी आश्वासन दिले व ज्याच्या आधारावर या महासंघाने त्यावेळी एकतर्फी आंदोलन मागे घेतले त्या लिखीत आश्वासनाची अम्मलबजावणी न होण्यामुळे आपली फसवणूक व विश्वासघात झाल्याची तीव्र भावना उच्च शिक्षण क्षेत्रामध्ये आज पसरली आहे. **दमनशक्तीच्या आधारावर फसवणुकीच्या व विश्वासघाताच्या या कार्यक्रमाला यशस्वी करण्याच्या कोणत्याही प्रयत्नाला ठामपणे व निर्धारपूर्वक विरोध करण्याचा निर्णय महासंघाचे हे कार्यकारी मंडळ घेत आहे.**"

**३४.** केंद्रातील मंत्री महाराष्ट्रातील घडामोडींवर दिल्लीत निर्णय घेतात. पण महाराष्ट्रात मात्र कोणी निर्णय घ्यायला तयार नाही. एवढे मोठे आंदोलन चालू असतांना महाराष्ट्रातील राज्यकर्ते करतात तरी काय? असा प्रश्न महाराष्ट्रभर विचारला जात होता. दिनांक ७ एप्रिल २०१३ रोजीच्या महासंघाच्या कार्यकारी मंडळाच्या ठरावामध्ये याबावत नाराजी व्यक्त करण्यात आली होती. या पार्श्वभूमीवर राज्याच्या उच्च शिक्षणमंत्र्यांनी दिनांक ८ एप्रिल २०१३ रोजी त्यांच्या विभागाला एक प्रसिद्धी पत्रक काढण्यास सांगितले. हे प्रसिद्धीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालय : मंत्रालय, मुंबई तर्फे दिनांक ८ एप्रिल २०१३ रोजी सायं. ५.३० वा. वृत्त विशेष ५२१ म्हणून "**सहावा वेतन आयोगाच्या फरकाची रक्कम महाविद्यालयीन शिक्षकांना मे अखेर देणार**" या मथळ्याखाली अधिकृतपणे प्रसिद्धीला देण्यात आले.

**३५.** राज्याच्या मंत्रिमंडळाने किंवा मुख्यमंत्र्यांनी घ्यावयाचा निर्णय हे काही उच्च शिक्षणमंत्री घेऊ शकत नाहीत. त्यांच्या अधिकारात असलेल्या बाबीच त्यांनी या प्रसिद्धी पत्रकात नमूद केल्या होत्या. त्यात नवीन किंवा जास्तीचे काही नव्हते. या अधिकृत प्रसिद्धीपत्रकाचा पहिला परिच्छेद पुढीलप्रमाणे होता.:-

"मुंबई, दि. ८ : राज्यातील अकृषी व संलग्नित महाविद्यालयातील (कायम स्वरुपी विनाअनुदानित महाविद्यालये वगळून) तसेच अनुदानित अभिमत विद्यापीठातील शिक्षक व शिक्षक समकक्ष पदावर कार्यरत असलेल्या शिक्षक संवर्गातील कर्मचाऱ्यांना सहावा वेतन आयोग लागू केल्यानंतर वेतन श्रेणीतील फरकापोटी आतापर्यंत ३१८.७५ कोटी रुपये देण्यात आले असून बाकी असलेले १२०९.९३ कोटी रुपये देण्यासाठी **५०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे.** तर उर्वरित ७०९.९३ कोटी रुपये इतकी रक्कम मे, २०१३ अखेर देण्याचे निश्चित करण्यात आले आहे. **तसेच ही संपूर्ण रक्कम एकाचवेळी देण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे, असे उच्च व तंत्र शिक्षण विभागाने दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात नमूद करण्यात आले आहे.**" पुढे या प्रसिद्धी पत्रकात असेही नमूद करण्यात आले होते की :-

"सहाव्या वेतन आयोगानुसार दिनांक १ जानेवारी २००६ ते ३१ मार्च २०१० या कालावधीतील देय असलेल्या वेतनापोटी अतिरिक्त खर्चाची एकूण रक्कम १९१०.८० कोटी रुपये इतकी आहे. या फरकाच्या रकमेपैकी ८० टक्के रक्कम केंद्र शासनाकडून उपलब्ध होणार व २० टक्के रक्कम राज्य शासन देणार आहे. ..... केंद्र सरकारच्या बदललेल्या भूमिकेप्रमाणे आता ८० टक्के प्रमाणे फरकाची रक्कम १५२८.८० **कोटी रुपये राज्य शासन प्रथम देणार असून केंद्र शासनाकडून प्रतिपूर्ती मागण्यात येणार आहे.**"

**३६.** दिनांक ७ एप्रिल २०१३ रोजी उच्च शिक्षण खात्याच्या प्रसिद्धी पत्रकावर महासंघाच्या अध्यक्षांनी एक प्रसिद्धी पत्रक काढून आपली प्रतिक्रिया नमूद केली ती पुढील शब्दात :-

"सदरहू विशेषवृत्त क्रमांक ५२१ ची अधिकृत मूळ प्रत मला वृत्तपत्राच्या कार्यालयातूनच प्राप्त झाली असून तीचे काळजीपूर्वक वाचन केल्यानंतर स्पष्टपणे काही बाबी नमूद करणे आवश्यक वाटते. ..... केंद्र शासनाची ८० टक्के मदत मिळवावयाची असेल तर ही थकबाकीची रक्कम राज्य शासनाला एकमुस्त व

***शासनाने काढलेल्या शासननिर्णयाचे पालन करण्याला खुद्द शासनच तयार नाही, अशा विचित्र परिस्थितीला महाराष्ट्रातील उच्च शिक्षण क्षेत्राला तोंड द्यावे लागत आहे.***

( महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाच्या ५ सप्टेंबर २०१८ ठरावाचा परिच्छेद ८ पहा. )

एकरकमी प्रथम अदा करावी लागेल व नंतरच केंद्राकडून परतावा मिळेल ही गोष्ट उच्च शिक्षण विभागाला समजलेली आहे असे दिसून येते. पण या वृत्तातील "**ही संपूर्ण रक्कम एकाचवेळी देण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे,**" असे उच्च व तंत्र शिक्षण विभागाने दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात नमूद करण्यात आले आहे." हे वाक्य वाचल्यांतर अजूनही त्यांचा प्रयत्नच चालू आहे अशी माहिती या बातमीतून उपलब्ध होते हे दुर्दैवी आहे. ..... मा. मुख्य सचिव, मा.उच्च शिक्षण मंत्री व मा. मुख्यमंत्री यांनी दिलेल्या लेखी आश्वासनांची पूर्तता करण्याची कोणतीही तयारी उच्च शिक्षण विभागात पूर्ण झालेली नाही हे यावरून स्पष्ट झालेले आहे."

**३७.** एप्रिल २०१३ मधील आणखी एक महत्त्वाचा घटनाक्रम म्हणजे मा.मुंबई न्यायालयासमोर झालेल्या घडामोडी, विद्यार्थी संघटनेने परीक्षा असहकार आंदोलनाबाबत सन २०१२ मध्ये दाखल केलेली एक याचिका (क्रमांक १३२६) मा. उच्च न्यायालयासमोर प्रलंबित होती. दिनांक १८ एप्रिल २०१३ रोजी मा. मुख्य न्यायाधिशांच्या खंडपीठासमोर ती याचिका सुनावणीसाठी आली. पुढची सुनावणी ३० एप्रिलला ठेवण्यात आली. त्यानंतर ८ मे रोजी मा.खंडपीठाने पुढील सुनावणी शुक्रवार दिनांक १० मे २०१३ रोजी सकाळी १० वाजता ठेवण्यात येईल असे त्या दिवशीच्या आदेशपत्रातच नमुद केले होते. हे प्रकरण मिटले पाहिजे अशी मा. न्यायमूर्तीची इच्छा प्रत्येक सुनावणीच्या वेळी दिसून येत होती. दिनांक ८ मे रोजीची ही स्थिती लक्षात घेता महासंघाच्या कार्यकारी मंडळाची तातडीची बैठक बोलाविण्याचा अध्यक्षांनी निर्णय घेतला.

**३८.** दिनांक ८ मे २०१३ रोजीची आणखी एक महत्त्वाची दुर्घटना नमूद केली पाहिजे. केंद्रशासन एवढे सहकार्य करायला तयार आहे. १५०० कोटी रुपयाचे अर्थसहाय्य महाराष्ट्र शासनाने प्रस्ताव सादर केल्याबरोबर देण्यास तयार आहे. ५०० कोटी रुपयाला महाराष्ट्र मंत्रिमंडळाने पूर्वीच मान्यता दिली होती. आणखी एक हजार कोटी रुपयाला मंत्रिमंडळाने मान्यता दिली तर थकबाकी अदा करून प्रस्ताव केंद्रशासनाकडे तातडीने पाठविता येईल. या भावनेने काही मंत्र्यांच्या आग्रहावरून दिनांक ८ मे २०१३ रोजीच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीसमोर एक हजार कोटी रुपयाचा प्रस्ताव मान्यतेसाठी ठेवण्यात आला होता. **त्यादिवशीच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत तो प्रस्ताव फेटाळण्यात आला.** तत्परतेने पुढाकार घेऊन दिल्लीतील घडामोडी घडवून आणल्यामुळे हे सारे श्रेय शरदराव पवारांना जाईल म्हणून श्री. पृथ्वीराज चव्हाणांच्या चिथावणीवरून काही मंत्र्यांनी केलेल्या विरोधामुळे हा प्रस्ताव फेटाळला गेल्याच्या बातम्या दुसऱ्या दिवशीच्या वृत्तपत्रात ठळकपणे प्रकाशित झाल्या होत्या. श्रेयवादासाठीच श्री. पृथ्वीराज चव्हाण या अपकृत्त्याचे नेतृत्त्व करीत होते याबाबत वेगवेगळी मते व्यक्त केली जात होती. ते काही का असेना, केंद्रातील दोन ज्येष्ठ मंत्र्यांनी थकबाकी अदा करण्यासाठी केलेली मेहनत मंत्रिमंडळाच्या या निर्णयामुळे उध्वस्त झाली ही ऐतिहासिक वस्तुस्थिती आहे.

**३९.** दिनांक ९ मे रोजी दुपारी १२ वाजता महासंघाच्या कार्यकारी मंडळाची बैठक मुंबई चर्चगेट येथील कार्यालयात सुरु झाली. बैठकीमध्ये सर्व घटनाक्रमाचा आढावा घेण्यात आला. मुख्य म्हणजे मा. न्यायालयासमोर चालु असलेल्या घटनाक्रमांचे व प्रत्येक वेळी मा. न्यायालयाने पारित केलेल्या आदेशपत्रांचे बारकाईने विश्लेषण करण्यात आले. बऱ्याच चर्चेनंतर महासंघाची भूमिका मांडणारे एक तपशिलवार शपथपत्र उद्या १०.३० वाजता मा. उच्च न्यायालयासमोर सादर करावे असा प्रस्ताव समोर आला. मुळ याचिका या विषयाशी संबंधित नाही **हे एक,** उद्या आपण शपथपत्र दाखल केले तरी समोरच्या पक्षाला त्यावर उत्तर दाखल करण्यासाठी वेळ नाही अशी भूमिका मा. न्यायालयाने घेतली तर काय? **हे दुसरे व तिसरे म्हणणे ऐनवळी** असे शपथपत्र दाखल करण्यास मा. उच्च न्यायालय परवानगी देईल काय? **या प्रश्नावर तपशीलवार चर्चा झाली व शपथपत्र दाखल करण्याचा निर्णय झाला.** अशा शपथपत्रात समाविष्ट करावयाचे मुद्दे कार्यकारी मंडळामध्ये निश्चित करण्यात आले. तपशीलवार शपथपत्र तयार करण्याची जबाबदारी ५ सदस्यांकडे सोपविण्यात आली व कार्यकारी मंडळाची बैठक दुसऱ्या दिवशी सकाळी ८.३० वाजेपर्यंत तहकुब करण्यात आली.

**४०.** पाच सदस्यांच्या समितीने त्याच दिवशी रात्री दोन वाजेपर्यंत बसून शपथपत्राचा मसुदा तयार केला. दुसऱ्या दिवशी म्हणजे दिनांक १० मे २०१३ रोजी सकाळी ८.३० वाजता महासंघाच्या कार्यकारी मंडळाची बैठक पुन्हा सुरु झाली. शपथपत्राचे परिच्छेदनिहाय वाचन होवून शपथपत्र सम्मत करण्यात आले व त्यानंतर तावडतोबीने असे शपथपत्र दाखल करण्यासाठीचे न्यायालयाच्या परिसरातील सोपस्कार पूर्ण करण्यात आले. याच वेळात महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाचे जवळ जवळ सर्व सदस्य मा. मुख्य न्यायमुर्तीच्या उच्च न्यायालयातील दालन क्रमांक ५२ मध्ये स्थानापन्न झाले होते. वृत्तपत्रातून ही बाब जाहीर झाल्यामुळे परिसरातून अनेक प्राध्यापक सुद्धा उपस्थित होते.

**४१.** दिनांक १० मे २०१३ रोजी बरोबर १०.३० वाजता मा. उभय न्यायमुर्तीनी आठ परिच्छेद असलेले १८ पृष्ठांचे ते शपथपत्र हाती आल्याबरोबर वाचायला सुरुवात केली. १५-२० मिनिटेपर्यंत स्तंब्ध शांतता न्यायालयात होती व मा. उभय न्यायमूर्ती बारकाईने त्या शपथपत्राचे वाचन करीत होते. महासंघाच्या सरचिटणीस श्रीमती ताप्ती मुखोपाध्याय यांनी महासंघाच्या वतीने सादर केलेल्या या शपथपत्रात पहिलाच परिच्छेद हा थकबाकी अदा करण्याबाबतच्या महासंघाच्या भूमिकेसंबंधी होता. त्या पहिल्या परिच्छेदामध्ये तीन लहान लहान उपपरिच्छेद समाविष्ट होते. पहिल्या उपपरिच्छेदामध्ये राज्यशासनाने या महासंघाला काय कळविले आहे ते तपशीलवारपणे नमूद करण्यात आले होते. ते पुढील शब्दात :-

"(i) I say that the scheme of pay revision under the sixth pay recommendations envisaged by the Union HRD Ministry and notified by the apex bodies UGC/AICTE is a composite scheme and only after its implementation in full the State would be entitled to receive 80% of the additional expenditure from the Union Government and the remaining 20 per cent will be the sole liability of the State. I say that during the academic year 2009-10, MFUCTO had called teachers to participate in an indefinite cease work which was called off after an Understanding was reached on 26th August 2009 which was converted into Minutes of the Meeting 26-8-2009 as at Ex. C. The agreed position on arrears was stated in the said Minutes as under :

"1 The State Government having taken into consideration the Composite Scheme submitted by the central Government, had issued Government Resolution dated 12th August 2009. While implementing the said Scheme, the aim will be to get 80 per cent of the financial assistance from the Central Government., If this 80% financial assistance from the Central Government is not received, the State Government shall pay 80% arrears as given to the State Government employees."

**४२.** महासंघाच्या वतीने दाखल करण्यात आलेल्या या शपथपत्राच्या पहिल्या परिच्छेदातील दुसऱ्या उपपरिच्छेदामध्ये केंद्रशासनाची योजना काय आहे? आणि केंद्रशासनाने राज्यांना काय कळविले आहे? याचे तपशील नमूद केलेले होते. ते पुढीलप्रमाणे :-

"(ii) I say and submit that the Union Ministry of Human Resource Development has come out with letter No.F.1-7/2010-U.II dated 14th August 2012 by which it was directed in para.3, 6 & 8 as under:

"3. Central Government has decided to provide financial assistance, for the period 1-1-2006 to 31-3-2010, to the extent of 80% as reimbursement to those state governments which

**If during the course of agitation negotiated settlement is not reached/arrived at then State-wide Indefinite Cease Work will begin from 25th September 2018.**

*See subpara (j) of para 11 (a) of the Movement Resolution*

may opt for the revised pay scales. The State Governments were to provide 20% of arrears from their own resources."

"6. State governments may please note that reimbursement of 80% of central share of the additionality of payment of arrears, for the period from 1-1-2006 to 31-3-2010 will be made by the central government in 2-3 installments. However, this would be by way of reimbursement only after the state government has made payment. In this connection, this Ministry letter of even number dated 11-5-2010 also refers."

"8. You are requested to kindly take further necessary action in this regard as detailed above and furnish the requisite information to this department urgently to enable us to process the release of central share accordingly."

I say that by letters dated 14th August 2013 and 14th November 2012 the HRD Ministry has called upon the **State Governments to release the 100% arrears in full and submit claim certificate so that 80% thereof would be released by the centre in 2-3 installments.** I crave leave to refer to and rely on the said documents when produced."

**४३.** उत्तरप्रदेश सरकारने सुद्धा हप्त्याहप्त्याने थकबाकी देण्याचा शासननिर्णय निर्गमित केला होता. तो अलाहाबाद उच्च न्यायालयाने दिनांक १७ जानेवारी २०१३ च्या आदेशाने रद्दबादल ठरविला व सर्व थकबाकी अदा केली तरच तुम्हाला ८० टक्के परतावा केंद्रशासनाकडून मिळू शकेल असे आदेश पारित केले. ही बाब महासंघाने वारंवार शासनाच्या लक्षात आणून दिली. अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या निर्णयाची प्रत महासंघाने शासनाला दिली पण राज्यशासन हलायला काही तयार नाही. ही गोष्ट या शपथपत्राच्या परिच्छेद १ च्या तिसऱ्या उपपरिच्छेदामध्ये पुढील शब्दात मांडण्यात आलेली होती. :-

"(iii) I say that government's decision in respect of release of arrears is totally contradictory to the Union government directions contained in its letters dated 14th August 2012 and 14th November 2012. I say and submit that MFUCTO in its meetings with the Government had pointed out that the arbitrary decisions of the government was also against the **Judgment and Order dated 17th January 2013 of the Hon'ble Allahabad High Court in W.P. No.64048 of 2011 which had quashed and set aside the UP Government's order to the effect that arrears of sixth pay commission revised scales of pay will be released only after the 80 per cent of additional expenditure was received from the central government.**"

**४४.** थकबाकी अदा करण्यासंदर्भात दुसऱ्या, तिसऱ्या, चौथ्या व पाचव्या वेतन आयोगाच्या वेळी बघायला न मिळालेली विक्षिप्त भूमिका राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी सहाव्या वेतन आयोगाच्या वेळी घेतली. "५०० कोटी रुपये एका अधिवेशनात मंजूर करु, त्यातील केंद्रशासनाकडून जेवढा परतावा मिळेल तेवढी रक्कम दुसऱ्या अधिवेशनात मंजूर करु, त्यापैकी जेवढा केंद्राकडून परतावा मिळेल तेवढा तिसरा हप्ता अदा करु." पुढे ही भूमिका बदलून सर्व रक्कम एप्रिल अखेर देऊ, त्यानंतर मे अखेर पर्यंत देवू अशी भूमिका उच्च शिक्षणमंत्र्यांनी मंत्रिमंडळात निर्णय न होताच जाहिर केली. प्रत्यक्षात फक्त ५०० कोटी रुपयालाच मंत्रिमंडळाची मान्यता मिळाली होती. दिनांक ८ मे २०१३ रोजी मंत्रिमंडळाची जी बैठक झाली त्यामध्ये उर्वरित एक हजार कोटीचा प्रस्ताव फेटाळण्यात आला. हे वृत्त दिनांक ९ मे रोजीच्या सर्वच वृत्तपत्रातून जाहिर झाले होते. महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या शपथपत्रामध्ये हा पहिलाच मुद्दा होता व खंडपीठासमोर ज्यावेळेला सुनावणी सुरू झाली त्यावेळेला खंडपीठाने शासनाच्या वकिलांना याबाबत विचारणा केली असता सरकारच्या वकिलांनी ५०० कोटी रुपयांचा पहिला हप्ता द्यायला आम्ही तयार आहोत असे सांगितले. मा. मुख्य न्यायमूर्तींनी अलाहाबाद उच्च न्यायालयाचा निर्णय झालेला असून त्यावर सर्वोच्च न्यायालयात अपिलही झालेले नाही. तेव्हा ५०० कोटी रुपयांचे न सांगता एकूण १५०० कोटी रुपयांची थकबाकी केव्हा देणार ते स्पष्ट सांगा असे विचारले. ही सर्व सुनावणी होत असतांना खंडपीठाने जवळ जवळ असे सुनावले की, तुम्ही याबाबतीत स्पष्ट भूमिका घेत नसाल तर आम्हाला आदेश द्यावे लागतील. सरकारी वकिलांनी तेथे उपस्थित असलेल्या सहसचिव जी.एस. रसाळ यांच्याशी चर्चा केली. रसाळ यांनी बाहेर जाऊन शासनात कोणाशी तरी फोनाफोनी केली. रसाळ हे पुन्हा परत आले आणि त्यांनी सरकारी वकिलांच्या कानात काहीतरी सांगितले आणि मग शासनाची भूमिका सरकारी वकिलांनी खंडपीठासमोर मांडली. उपरोक्त 'आँखो देखा हाल' हा काही जसाच्या तसा मा.खंडपीठाच्या आदेशामध्ये नमूद व्हावा असे अपेक्षीत नसते. पण या आदेशामध्ये जे शब्द मा.खंडपीठाने वापरले ते वाचले म्हणजे जे चित्र डोळ्यांसमोर उभे राहते तो "आँखो देखा हाल"च आहे. मा.खंडपीठाच्या आदेशातील त्याबाबतचा परिच्छेद २ पुढीलप्रमाणे :-

"**2**) So far as the first demand is concerned, Dr.Mukhopadhyay has given the past events. We do not propose to go into the dates and events referred to in the affidavit but we record the statement being made by Mr. Saluja, learned A.G.P. under instructions of Mr. G. S. Rasal, Joint Secretary to the Government of Maharashtra, Higher Education and Technical Education Department, that the **arrears of salary on the basis of 6th Pay Commission recommendations have partly been paid in March 2013 and that the balance amounts will be released by 31 July 2013."** ८ मे २०१३ रोजी झालेल्या बैठकीमध्ये श्री. पृथ्वीराज चव्हाण यांच्या अध्यक्षतेखालील मंत्रिमंडळाच्या बैठकीत १००० कोटीचा प्रस्ताव फेटाळून लावला. तशा बातम्या ठळक मथळ्याने ९ मे २०१३ रोजीच्या सर्व वृत्तपत्रात प्रकाशित झाल्या. पण महासंघाने केलेल्या चिकाटीच्या पुराव्यामुळे "१५०० कोटी रुपयांची थकबाकी ३१ जुलै २०१३ पावेतो अदा करण्यात येईल" हा दिलासा मा. उच्च न्यायालयाच्या निर्णयाने मिळाला व त्याप्रमाणे पुढे थकबाकी मिळालीसुद्धा.

**४५.** आंदोलनातील सहभागाबद्दल ज्या कारणे दाखवा नोटीसेस देण्यात आलेल्या आहेत त्याचीही चर्चा झाली. संघटनेने उद्यापासून परिक्षेच्या कामात सहकार्य करण्याचे न्यायालयात मान्य केलेले आहे. त्याप्रमाणे सबंधीत शिक्षकांनीसुद्धा आम्ही परिक्षेच्या कामाशी सहकार्य करु असे अंडरटेकींग द्यावे असे आम्ही आदेशित करीत आहोत. आता यानंतर दिलेल्या कारणे दाखवा नोटीसेसवर यापुढे कोणतीही कारवाई करण्याची गरज नाही अशा अर्थाचा मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयातील परिच्छेद २२ पुढील प्रमाणे :-

"(22) Now finally coming to the question of show cause notices which might have been issued by the University or the Colleges, learned Counsel for respondent No.2 association states that members of respondent No.2 Association will extend utmost cooperation for the examination work from tomorrow. In view of the above assurance from respondent No.2 Association, we direct the concerned teachers also to give individual undertakings that henceforth they they will render co-operation for examination and other related work. **We are of the view that Universities and the Colleges may not take any further action against the concerned teachers who give such undertakings.**"

**४६.** मा. न्यायालयाने आपल्या निर्णयात शासनाने निर्णय घेण्यात केलेल्या दिरंगाईबद्दल काही मते व्यक्त केलेली आहेत असे दिसून येते की या संघटनेच्या अनेक मागण्या अनेक दिवसापासून पडून आहेत. त्या सर्व पूर्णत्वाने मान्य करणे एखाद्यावेळी शासनाला शक्य नसेलही पण जे काही निर्णय घ्यायचे ते घेऊन त्याबाबतचे शासननिर्णय निर्गमित करण्यास शासनाला कोणीही मनाई केलेली नव्हती. शासननिर्णयाने संघटनेचे समाधान झाले नसते तर त्यांना कायदेशीर उपाययोजनांचा मार्ग मोकळा राहीला असता पण कोणताच शासननिर्णय न निघाल्याने संघटनेला परीक्षा असहकाराचे आंदोलन करण्यास बाध्य करण्यात आले हे संघटनेचे म्हणणे मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या परिच्छेद २३ मध्ये पुढील शब्दात नमुद आहे. :-

"(23) We are constrained to make these observations because the teachers of respondent No.2-Association were of the view that they are entitled to certain demands and even if the State Government and the Universities were not inclined to accept all the demands in their entirety, **nothing**

**prevented the State Government from coming out with their decision and issuing a G.R.** If such decision had been taken earlier and if respondent No.2-Association or teachers were not satisfied with the decision, they would have taken necessary legal proceedings for enforcement of their alleged rights. It appears that decision was not taken by the Government and, according to respondent No.2-Association, therefore, they were compelled to take recourse to non co-operation to the examination related work. "

**४७.** आंदोलनाच्या काळामधील मार्च व एप्रिल २०१३ या महिन्यांचे वेतन शासनाने अडवून ठेवले होते, याबाबतची सुद्धा चर्चा मा. खंडपीठासमोर झाली. मा.खंडपीठाचा याबाबतचा निर्णय परिच्छेद २१ मध्ये नमूद आहे. तो पुढील शब्दात :-

**"21**) On this issue, we do not propose to express any opinion. We are of the view that, this issue also respondent No.2 Association may discuss with the authorities for considering as to how much salary should be released to the teachers who have not extended their co-operation for the examination related work."

**४८.** दिनांक ९ ऑगस्ट २०१८ रोजी राज्यसभेत उत्तरीत झालेल्या तारांकित प्रश्न क्रमांक २४१ मुळे उघड झालेली वस्तुस्थिती लक्षात घेता सहावा वेतन आयोग लागू करतांना घडलेल्या घटनाक्रमाचा हा वृत्तांत मुद्दाम आंदोलन काळातील गोठविण्यात आलेल्या ७० दिवसांच्या वेतनासंदर्भात विद्यमान उच्च शिक्षणमंत्री श्री. विनोद तावडे यांच्या लक्षात आणून द्यावा या हेतूने नमूद केला आहे. याबाबत श्री. विनोद तावडे यांनी विरोधी पक्षनेते असतांना आझाद मैदानावरील प्राध्यापकांच्या सभेत काय उद्‌गार काढले होते ही गोष्ट महत्त्वाची असली तरी त्याबाबतीत त्यांचा युक्तिवाद सातत्याने असा आहे की, "विरोधी पक्ष नेता म्हणून त्यावेळी जी माहिती मला मिळाली होती त्या आधारावर मी ते मत व्यक्त केले होते" उच्च शिक्षणमंत्री या नात्याने सर्व माहिती त्यांच्या समोर असतांना अधिकृत शासकीय बैठकीत मा.उच्च शिक्षणमंत्र्यांनी मध्ये तत्कालीन शासनाने ७०-७२ दिवसांचा शिक्षकांचा जो पगार रोखून ठेवला तो फालतूपणाचा निर्णय होता, एवढेच सांगितले नाही तर पुढे जाऊन असेही सांगितले की, शेवटी परीक्षेचे काम त्या शिक्षकांनीच केले ना? तरी त्यांचा पगार देणार नाही हे चिटींग असल्याचे त्यांनी जाहीर केले. शब्दशः पुढील शब्दात :-

(१) **"त्याचबरोबर No work No pay वगैरे हे असले फालतू निर्णय जे आहेत ना, म्हणजे हे कसे रडीचा डाव. म्हणजे त्यावेळी तुम्ही मला त्रास दिला आता मी तुम्हाला त्रास देतो आणि त्यामुळे नंतर तुम्ही प्राध्यापकांकडून काम करून घेतलचं ना? रिझल्ट नंतर लावलेचं ना? पेपर तपासून घेतलेच की नाही? पण त्या दिवसांचा पगार देणार नाही वगैरे ही कुठली चिटींग आहे?"**

(२) **"हे खरं आहे की, याला केवळ प्राध्यापक संघटना जबाबदार नाही आहे. प्राध्यापकांच्या मागण्या वेळेवर न ऐकणारं सरकार हे सुद्धा तितकेच जबाबदार, आम्ही त्यात आहोतच."**

(३) **"या विषयाची माझी भूमिका स्पष्ट आहे. परीक्षांवर बहिष्कार हे महाराष्ट्रात बंदच झालं पाहिजे. प्राध्यापकांच्या मागण्या सरकारने वेळेत ऐकल्या पाहिजेत, त्या वेळेत सोडवल्या पाहिजेत."**

**४९.** राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी, राज्याच्या मुख्य सचिवांनी, राज्याच्या उच्च शिक्षण मंत्र्यांनी लेखी स्वरूपात दिलेल्या आश्वासनांचे पालन झाले नाही. त्यांच्याच पक्षाच्या पंतप्रधानांनी, केंद्रीय मंत्रिमंडळाने १५०० कोटी रुपयांची आर्थिक मदत करण्याची आखलेली योजना कशी पदरात पाडून घेता येईल याचा मुख्यमंत्री या नात्याने त्यांनी थोडासाही विचार केला नाही. केंद्रातल्या दोन ज्येष्ठ मंत्र्यांनी १५०० कोटी रुपये ताबडतोब उपलब्ध करून देण्यासाठी समोर केलेला प्रस्ताव राज्यमंत्रिमंडळात उलटा निर्णय घेऊन तत्कालीन मुख्यमंत्र्यांनी उध्वस्त केला. "८० टक्के थकबाकी केंद्राकडून मिळाली नाही तर राज्यशासनाच्या निधीतून ही थकबाकी दिली जाईल" असे स्पष्टपणे उच्च शिक्षणमंत्री व मुख्य सचिव यांनी लेखी कबूल केल्यामुळे ही थकबाकी केव्हा ना केव्हा राज्यशासनाला द्यावीच लागली असती. पण १५०० ते १६०० कोटी रुपयांचा निधी मिळविण्यापासून महाराष्ट्र राज्य वंचित राहिले असते. महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाने या प्रश्नाचा सातत्याने चिकाटीने पाठपुरावा करीत दिनांक १० मे २०१३ रोजी जे शपथपत्र मा.उच्च न्यायालयात दाखल केले त्यावर मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयामुळे केंद्राकडून ही थकबाकी महाराष्ट्राला मिळाली याबद्दल त्या महासंघाचे आभार मानावयाचे सोडून, वस्तुतः न्यायालयाच्या निर्णयामध्येच शासनाने योग्य वेळी योग्य निर्णय घेतले नाहीत हे स्पष्टपणे नमूद केलेले असतांना व परीक्षा बहिष्कार आंदोलन केले म्हणून कारणे दाखवा नोटीसेस विद्यापीठांनी शासनाच्या आदेशावरून दिल्या असतांना त्या मागे घेण्याचे आदेशसुद्धा मा.उच्च न्यायालयाने दिले. असे असतांना वेतन गोठविण्याची पूर्वीच करण्यात आलेली कारवाई रद्द करण्याचा निर्णय मा. मुख्यमंत्री श्री. पृथ्वीराज चव्हाण यांनी घेतला नाही व सुडबुद्धीची ती कारवाई तशीच पुढे सुरू ठेवली. आज हे भिजत घोंगडे पदपरत्वे श्री. विनोद तावडे यांच्या गळ्यात येऊन पडले असून त्यांनी गेली चार वर्षे ते जास्तच भिजत ठेवले आहे.

**५०.** सहाव्या वेतन आयोगाची संपूर्ण थकबाकी एकमुस्त अदा करण्याचा निर्णय राज्यकर्त्यांनी घेतलेला निर्णय नाही. महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या सततच्या चिकाटीच्या प्रयत्नाचा शेवट न्यायालयात शपथपत्र दाखल करण्यात झाला. मा.उच्च न्यायालयाने त्यावर दिलेल्या निर्णयामुळे सर्व विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षक व राज्य म्हणून महाराष्ट्र राज्य लाभान्वित झाले. महासंघाने हे प्रयत्न केले नसते तर राज्यसभेतील तारांकित प्रश्न क्रमांक २४१ च्या उत्तरात परिपूर्ण प्रस्ताव सादर करून केंद्राकडून संपूर्ण अर्थसहाय्य मिळविणाऱ्या राज्यांची संख्या १४ ऐवजी १३ दिसली असती व असे संपूर्ण अर्थसहाय्य न मिळाल्याचा गलथानपणा करणाऱ्या राज्यांची संख्या १५ ऐवजी १६ दिसली असती.

**५१. ज्या कामासाठी वेतन दिले जात नाही विद्यापीठातर्फे पारिश्रमिक (Remuneration) दिले जाते. "ते काम केले नाही" म्हणून वेतन रोखून ठेवले व "ते काम समाधानकारकपणे पार पाडले" म्हणून पुढे विद्यापीठाने पारिश्रमिक अदा केले मात्र ते काम न केल्याचे निमित्त करून रोखून ठेवण्यात आलेले वेतन अदा करण्यात आले नाही. "आम्ही ते अदा करणार" असे वारंवार सांगितले जाते. फक्त केंव्हा? या प्रश्नाचे उत्तर दिले जात नाही** ते उत्तर मिळावे अशी शिक्षकांची अपेक्षा आहे. द्वेषमूलक हेतूने व सुडबुद्धीच्या भावनेने तत्कालीन मुख्यमंत्र्यांनी एखादा निर्णय घेतला असेल तर तो काही अंतिम शब्द नसतो हे सुद्धा लक्षात घेणे आवश्यक असते. ही सुडबुद्धी इतकी टोकाची की, एवढी मोठी रक्कम कापतांना, कारणे दाखवा नाही, म्हणणे ऐकून घेण्याची त्यांना गरज वाटली नाही. परीक्षेचे काम दिले होते की नव्हते हे न पाहता रकमा कापल्या, दिलेले काम मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार व्यवस्थित पार पाडले तरी कापले ते कापलेच. ७० दिवसांच्या गोठविण्यात आलेल्या वेतनाची र्निगोठवणूक करण्यासाठी महाराष्ट्र प्राध्यापक महासंघ सतत सर्व बाजूने प्रयत्नशील आहे. दुष्ट भावनेने किंवा द्वेष भावनेने राज्यकर्त्यांनी घेतलेल्या अपनिर्णयांच्या निर्मूलनासाठी कसोशीने प्रयत्न करणे हे संघटनेचे कामच असते. अशा निर्णयांचे वेळापत्रक हे काही संघटनेच्या हाती असत नाही. हे खरे असले तरी निर्णय होण्याची वेळ ही आल्याशिवाय राहत नाही हेही तेवढेच खरे.

*****

**NUTA BULLETIN** (Official Journal of NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION) **EDITOR :** Prof. Vivek S. Deshmukh, Balaji Society, Yavatmal 445 001. **PUBLISHER :** Prin. S. T. Sangle, Bajoriya Nagar, Yavatmal 445 001. Published at NUTA Bulletin Office, Shikshak Bhavan, Sant Gadge Baba Amravati University Campus, **Amravati- 444 602. PRINTED AT** Bokey Printers, Gandhi Nagar, Amravati. (M.S) **REGD NO. MAHBIL/2001/4448** Postal Registration No. ATI/RNP/078/2018-20 (Uploaded on www.nuta.in on 12.09.2018) Price : Rs. Five / Name of the Posting office : **R.M.S. Amravati.** Date of Posting **: 15.09.2018**

**If Undelivered , please return to :** NUTA Bulletin Office, Shikshak Bhavan, Sant Gadge Baba Amravati University Campus, **Amravati- 444 602.**

To,...........................................................

...............................................................

...............................................................

...............................................................